POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-३२१ ● मुंबई, मंगळवार, २३ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

मेघगर्जनेसह पावसाचे आगमन!

हवामानात उलटफेर, येत्या काहीच तासांत मान्सून धुमाकूळ घालणार...

अनेक भागांत मुसळधार सरी, ऑरेंज अलर्ट जारी

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक,



राज्यातील हवामानात मोठा उलटफेर जाणवू लागला आहे. मान्सून पुन्हा एकदा सक्रिय राहणार असल्याची शक्यता आहे. जून महिना संपत आला मात्र तरीही मान्सूनचा पत्ता नाही. राज्यात मान्सून सक्रिय राहणं अपेक्षित असून यंदा मान्सूनला हजेरी लावण्यास विलंब झाला आहे. अशातच जाणून घेऊयात 22 जून 2026 रोजी राज्यातील एकूण हवामानाचा अंदाज.

- **कोकण :** कोकण विभागात मोठा बदल जाणवण्याची शक्यता आहे. मुंबईसह काही ठिकाणी रविवारी पावसाने जोडपलं होतं, आता पुढाली काही दिवस मुंबईसह पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत वादळी वाऱ्यांसह तुरळक पाऊस होणार असल्याची शक्यता आहे. या सर्व जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट वर्तवण्यात आला आहे.
- **पश्चिम महाराष्ट्र :** पश्चिम महाराष्ट्रातील पुणे आणि पुणे घाटमाथा परिसरात पावसाला सुरूवात झाली आहे. तसेच रविवारी मान्सूनपूर्व पावसाने पुण्यात दमदार हजेरी लावली. येत्या काहीच तासांत संपूर्ण पश्चिम महाराष्ट्राला मान्सून झोडपणार असून यलो अलर्टचा अंदाज वर्तवला आहे. पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सोलापूर या जिल्ह्यांत वादळी पावसाचा यलो अलर्टचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.
- **उत्तर महाराष्ट्र :** उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांत हलका ते मध्यम प्रमाणात पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला. अशातच वातावरणात 25 जून पासून मान्सून सक्रिय होणार असल्याची शक्यता अधिक आहे.

पुण्यात 'या' भागांत पावसाची जोरदार बॅटिंग, कुमशेत परिसरात ढगफुटी सदृश्यस्थिती

पुण्याच्या जुन्नर तालुक्यातील माळशेज अणे परिसरात पावसाने दमदार बॅटिंग केली आहे. कुमशेत परिसरात ढगफुटीसदृश्य स्थिती निर्माण झाली. कुमशेतच्या रस्त्याला पाण्याचं स्वरुप प्राप्त झालं आहे. परिसरातील भूभाग आणि मुरबाड भाग असल्याने पाणी आदिवासी वस्तीकडे वाहत गेले आहे. या वस्तीला आणि शाळेला पाण्यात वेढा घातला होता. यामुळे नागरिकांची धावपळ उडाली आहे. अचानकपणे वाढलेल्या या पाण्यामुळे नागरिकांची धावपळ उडाली आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी किंवा धोका निर्माण झाला नसल्याची सकारात्मक बाब आहे.

माळशेज ते अणे परिसरात पावसाचा धुमाकूळ : माळशेज ते अणे परिसरात पावसाने धुव्वादार हजेरी लावली होती. ज्यात कुमशेत, ओतूर, रोहोकडी आंबेगव्हाण, अहिनेवाडी, डिंगोरे, मढ, पारगाव, नेतवड, ठीकेकरवाडी, हिवरे खुर्द, डुंबरवाडी आणि धोलवड या भागात अधिक पाऊस झाल्याने शेतीचे नुकसान होण्याची शक्यता आहे.

रस्त्याला पाण्याचे स्वरुप : या पावसामुळे डोंगराळ भागातील नदी नाले-ओढे वाहू लागल्याचे दिसून आले. काही ठिकाणी पाण्याचे छोटे तलाव देखील तयार झाले आहेत. ओतूर शहरात रस्त्याला पाण्याचे स्वरुप आले आहे. पाणी वाढल्याने वाहन चालकांना पाण्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. पेरणीपूर्वीच्या मशागत कामांना मोठी गती मिळणार आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस काही दिवस हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज वर्तवला आहे. तसेच मान्सूनच्या आगमनाची चाहूल लागल्याने नागरिक पावसाची चातकाप्रमाणे वाट पाहू लागली आहेत.


मान्सूनच्या प्रगतीमुळे राज्यात आनंदाचे वातावरण

मुंबई : बहुप्रतिक्षित मान्सूनने अखेर दोन आठवड्यांच्या विलंबानंतर पुन्हा एकदा महाराष्ट्रात पुढे वाटचाल सुरू केली आहे. आज कोकणातील रत्नागिरी जिल्हा ओलांडून रायगडमधील अलिबागपर्यंत मान्सून पोहोचला. मध्य महाराष्ट्रात सातारा, सोलापूर पार करत तो पुणे जिल्ह्यातील मावळ, मुळशी आणि पुणे शहरापर्यंत दाखल झाला आहे. तसेच दक्षिण अहिल्यानगरमधील श्रीगोंदा, कर्जत, जामखेड भागातही त्याची चाहूल लागली आहे. मराठवाड्यातील धाराशिव, लातूर आणि नांदेड जिल्ह्यांचा मोठा भाग मान्सूनच्या प्रभावाखाली आला आहे. विशेष म्हणजे अरबी समुद्र शाखेने तेलंगणातून पुढे सरकत दक्षिण विदर्भातील गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्याच्या प्रवेशद्वारापर्यंत मजल मारली आहे. जरी या सर्व भागांमध्ये सर्वत्र पावसाची जोरदार नोंद झाली नसली, तरी मान्सूनी वाऱ्यांनी हजेरी लावली आहे. वातावरण सध्या अनुकूल असून येत्या २-३ दिवसांत मुंबईसह उर्वरित महाराष्ट्रात मान्सून वेगाने पुढे सरकण्याची शक्यता आहे. पावसाळ्यात समुद्र सपाटीवरील कमी दाबाचा पट्टा दक्षिणेकडे सरकला असून सध्या तो पंजाब-हरियाणाऐवजी राजस्थान, बिहार आणि उत्तर प्रदेशातून जात आहे. त्याचबरोबर वायव्येकडून येणाऱ्या उष्ण वाऱ्यांचा प्रभाव कमी झाला आहे. अरबी समुद्रात सुमारे ३.५ ते ४ किमी उंचीवर असलेली प्रत्यावर्ती वाऱ्यांची प्रणाली कमजोर झाली आहे. त्यामुळे मान्सूनी वाऱ्यांना बळ मिळून महाराष्ट्रात त्यांची प्रगती वेगाने होत आहे. शुक्रवार, २६ जूनपर्यंत विदर्भातील वातावरणात उष्णतेची तीव्र लाट तसेच रात्रीच्या उकाडा जाणवेल, अशी माहिती आयएमडी पुणे या संस्थेने दिली आहे. दोन आठवड्यांपासून दक्षिण कोकणातील हर्णे आणि मध्य महाराष्ट्रातील सोलापूर येथे स्थिर असलेल्या मान्सूनने आज पुणे आणि रायगड जिल्ह्यातील अलिबागपर्यंत वाटचाल केली आहे, अशी माहिती हवामान विभागाने दिली. दरम्यान, मुंबईसह राज्यातील इतर भागात लवकरच मान्सूनची वाटचाल होण्यास हवामान स्थिती अनुकूल आहे, असेही हवामान विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीपत्रकात नमूद करण्यात आले आहे. राज्यात सध्या तुरळक ठिकाणी वादळी पावसाची नोंद होत असली तरीही बहुतांश भागात कोरडे हवामान आहे. यंदा तळकोकणात ६ जून रोजी मान्सून दाखल झाला होता. साधारणपणे १५ ते २० जूनच्या आसपास राज्यातील बहुतांशी भागात मान्सून दाखल होतो. मात्र, यंदा जून महिना संपत आला तरीही राज्यात समाधानकारक पाऊस नोंदला गेला नाही. दरम्यान, रविवारपासून हवामानात बदल होत असून मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी हवामान स्थिती अनुकूल आहे.

फेरपरीक्षेत विद्यार्थ्यांची मोठी गैरहजेरी

नाशिकमध्ये हजाराहून अधिक उमेदवार अनुपस्थित

■परभणी। प्रतिनिधी,



वैद्यकीय शिक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी 'नीट यूजी' फेरपरीक्षा रविवारी (दि. २१) जिल्ह्यात कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत शांततेत पार पडली. मात्र या परीक्षेत विद्यार्थ्यांच्या उपस्थितीपेक्षा गैरहजेरीचीच अधिक चर्चा रंगली. मागील परीक्षेच्या तुलनेत यावेळी अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या तब्बल चौपट वाढल्याचे चित्र समोर आले आहे. पेपरफुटीच्या वादानंतर पुन्हा आयोजित करण्यात आलेल्या या परीक्षेसाठी नाशिक जिल्ह्यातील २१ परीक्षा केंद्रांवर व्यवस्था करण्यात आली होती. शहरातील केंद्रांवर नोंदणी केलेल्या ९ हजार १११ विद्यार्थ्यांपैकी केवळ ८ हजार ६३ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित राहिले, तर तब्बल १ हजार ४८ विद्यार्थी गैरहजर राहिले. विशेष म्हणजे, मे महिन्यात झालेल्या मूळ परीक्षेत केवळ २७३ विद्यार्थी अनुपस्थित होते. त्यामुळे फेरपरीक्षेतील वाढलेली गैरहजेरी प्रशासनासाठीही चिंतेचा विषय ठरली आहे

प्रश्नपत्रिका बँकेच्या लॉकरमध्ये

मागील पेपरफुटीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर यावेळी प्रश्नपत्रिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले होते. प्रश्नपत्रिकांचे दोन स्वतंत्र संच तयार करून ते बँकेच्या लॉकरमध्ये सुरक्षित ठेवण्यात आले होते. परीक्षेच्या दिवशी पहाटे केंद्रीय स्तरावरून कोणता संच वापरायचा याबाबत सूचना प्राप्त झाल्यानंतरच प्रश्नपत्रिकांचे जिल्ह्यातील विविध केंद्रांवर वितरण करण्यात आले. त्यामुळे प्रश्नपत्रिकेच्या सुरक्षेबाबत प्रशासनाने कोणतीही तडजोड केली नसल्याचे दिसून आले.

विद्यार्थ्यांचा सूर : प्रश्नपत्रिका अधिक कठीण

सायंकाळी ५.१५ वाजता परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला. अनेक विद्यार्थ्यांनी यंदाची प्रश्नपत्रिका मूळ परीक्षेच्या तुलनेत अधिक कठीण असल्याचे सांगितले. रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयांतील प्रश्न तुलनेने सोपे वाटले असले तरी भौतिकशास्त्राच्या प्रश्नांनी विद्यार्थ्यांची चांगलीच परीक्षा घेतल्याची प्रतिक्रिया उमेदवारांनी दिली. मात्र यावेळी देण्यात आलेल्या अतिरिक्त १५ मिनिटांच्या वेळेमुळे प्रश्न सोडविण्यास काही प्रमाणात मदत झाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

प्रवेशासाठी कडक सुरक्षा तपासणी

विद्यार्थ्यांना दुपारी १२.३० वाजल्यापासून परीक्षा केंद्रात प्रवेश देण्यास सुरुवात करण्यात आली होती. दुपारी १.३० वाजता प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे बंद करण्यात आली. यावेळी प्रत्येक विद्यार्थ्याची डिजिटल आणि बायोमेट्रिक पडताळणी करण्यात आली. मेटल डिटेक्टरद्वारे तपासणी करूनच विद्यार्थ्यांना आत प्रवेश देण्यात आला. मोबाईल फोन, स्मार्ट वॉच, दागिने, मोठ्या हेअरपिन्स तसेच पेनसारख्या वस्तूही बाहेरच जमा करण्यात आल्या. विद्यार्थिनींना गळ्यातील सोन्याच्या साखळ्या व इतर धातूच्या वस्तू काढून ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होऊ नये यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली होती.

परीक्षा संपताच गंगापूर रोडवर वाहतूककोंडी

परीक्षा संपल्यानंतर मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी आणि पालक एकाच वेळी केंद्राबाहेर पडल्याने गंगापूर रोड परिसरात वाहतूक विस्कळीत झाली. सरकारवाडा पोलिस स्टेशन ते मॅरेथॉन चौक या मार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. काही काळ या भागात वाहतूककोंडीची परिस्थिती निर्माण झाली होती.

जिल्ह्यातील एकूण आकडेवारी

- एकूण नोंदणीकृत विद्यार्थी : ११,१६२
- परीक्षेला उपस्थित : १०,०२९
- अनुपस्थित विद्यार्थी : १,१३३

लातूरच्या 'क्लास बाजारा'ला फटका

सोशल मीडियातील अफवा पडल्या भारी

नीट पेपर लीक प्रकरणात सीबीआयने स्थानिक पातळीवरील तीन बड्या व्यक्तींना अटक केल्यानंतर लातूरमधील कोचिंग क्लासचे जाळे चौकशीच्या फेऱ्यात आले आहे. मात्र, यंदा लातूरमध्ये क्लास प्रवेशांमध्ये झालेली मोठी घट ही सोशल मीडियावरून पसरवल्या जाणाऱ्या अफवांमुळेच अधिक झाली असल्याचे येथील व्यावसायिकांचे म्हणणे आहे.



■लातूर। प्रतिनिधी,

नीट पेपर लीक प्रकरणात सीबीआयने स्थानिक पातळीवरील तीन बड्या व्यक्तींना अटक केल्यानंतर लातूरमधील कोचिंग क्लासचे जाळे चौकशीच्या फेऱ्यात आले आहे. मात्र, यंदा लातूरमध्ये क्लास प्रवेशांमध्ये झालेली मोठी घट ही सोशल मीडियावरून पसरवल्या जाणाऱ्या अफवांमुळेच अधिक झाली असल्याचे येथील व्यावसायिकांचे म्हणणे आहे.

लातूर शहरात ३०० हून अधिक वसतिगृहे आणि त्यांच्यावर अवलंबून असलेले अनेक व्यवसाय आहेत. शहरात १२ वीच्या परीक्षेसाठी ७० ते ८० हजार विद्यार्थी बाहेरून आलेले आहेत.

'नीट' पेपर लीक प्रकरणाच्या संदर्भात सीबीआयने शहरातील ह्यआरसीसी'चे संस्थापक शिवराज रघुनाथ मोटेगावकर, सेवानिवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी आणि डॉ. मनोज शिरुरे यांना अटक केली होती. व्यापारी, हॉस्टेल चालक आणि कोचिंग क्लासच्या प्रतिनिधींच्या मते, हे क्षेत्र आधीच अनेक आव्हानांना तोंड देत होते, त्यातच चालू शैक्षणिक वर्षात परिस्थिती अधिकच खालावली आहे.

भागधारकांच्या मते, सर्वात मोठी चिंता जिल्हा उद्योग केंद्राच्या एका नवीन आदेशामुळे निर्माण झाली आहे. लातूर इंडस्ट्रियल इस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये उत्पादनासाठी दिलेल्या औद्योगिक शेडमध्ये बेकायदेशीरपणे चालणाऱ्या सर्व व्यावसायिक कामे तातडीने बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सरकारने कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी लागू केलेले बायोमेट्रिक उपस्थितीचे बंधनकारक धोरण यामुळे पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. याव्यतिरिक्त, लांबलेला मान्सून आणि दुष्काळसदृश परिस्थितीच्या भीतीमुळेही पालकांच्या प्रवेश घेण्याच्या निर्णयावर विपरीत परिणाम झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

लातूर हॉस्टेल असोसिएशनचे अध्यक्ष नितीन पवार यांनी सांगितले की, सोशल मीडियावरून 'लातूर पॅटर्न'ची बदनामी करणाऱ्या बातम्या आणि सर्व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या उपस्थितीसाठी बायोमेट्रिक मशिन्स बसवण्याचा शासनाचा निर्णय, यामुळे चालू शैक्षणिक वर्षात १२ वीच्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशात ४० टक्क्यांची घट झाली आहे.

बँकेकडून कर्ज घेऊन अनेक हॉस्टेल्स आणि संबंधित संस्था उभारल्या गेल्या आहेत, तर काही भाड्याच्या जागेत सुरू आहेत. त्यामुळे या भीतीच्या वातावरणामुळे मालक सध्या आर्थिक तणावाखाली असल्याचे त्यांनी सांगितले.

अन्य जिल्ह्यांना फायदा

लातूरबद्दल झालेल्या नकारात्मक प्रसिद्धीचा अप्रत्यक्ष फायदा इतर जिल्ह्यांतील कोचिंग सेंटर्सना झाला. पारंपरिकपणे लातूरला येणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वतःकडे आकर्षित करण्याची नामी संधी त्यांना मिळाली, असे कदम यांनी स्पष्ट केले.

अवघ्या 2 मिनिटांच्या उशिराने विद्यार्थ्यांचे वर्ष वाया

परीक्षेला बसू न दिल्याने रडू कोसळले... पोलिस बंदोबस्तात 'नीट' परीक्षा

■वसई। प्रतिनिधी,



देशभरात पेपरफुटीनंतर होत असलेल्या नीट यूजी 2026 च्या परीक्षेसाठी आज देशभरात एनटीएनने मोठी तयारी केल्याचं दिसून आलं. त्याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील सर्वच परीक्षा केंद्रावर पोलिसांचा तगडा बंदोबस्त लागलो होता. लातूर पॅटर्नमुळे देशभरात गाजलेल्या लातूर जिल्हा प्रशासनानेही नीट परीक्षेची सर्व तयारी केली होती. परीक्षा पारदर्शक, सुरक्षित आणि सुरळीत पार पडावी यासाठी प्रत्येक परीक्षा केंद्रावर कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तर, एनटीएकडून देण्यात आलेल्या नियमांचेही काटेकोरपणे पालन करण्यात येत होते. एनटीएच्या याच नियमांचा फटका दोन विद्यार्थ्यांना बसला असून केवळ दोन मिनिटे उशीर झाल्याने मुंबईतील दोन विद्यार्थ्यांना परत फिरावे लागले.

मुंबईतील परळ भागातील महर्षी दयानंद कॉलेज हे यंदाच्या पुनर्परिक्षा घेण्यात येत असलेल्या ठएएळ पेपरचे केंद्र आहे. या ठिकाणी दोन विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर पोहोचण्यासाठी अवघे दोन मिनिटे उशीर झाल्याने त्यांचे अक्षरशः वर्ष वाया गेलं आहे. परीक्षा केंद्रावर केवळ 2 मिनेट उशिरा पोहचल्याने दोन विद्यार्थ्यांना परीक्षेला बसता आले नाही, त्यामुळे परीक्षा केंद्रावर मोठा गोंधळ झाला. यावेळी, परीक्षार्थी उमेदवारांची घालमेल पाहून इतर विद्यार्थांच्या पालकांनी देखील संबंधित दोन विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी आता घ्यावे म्हणून प्रशासनाकडे विनंती केली. मात्र, नीट अधिकाऱ्यांनी नियमांच्या पुढे जात येत नाही, असे म्हणत दोन्ही विद्यार्थ्यांना प्रवेशास मनाई केली. त्यामुळे, या दोन्ही विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले होते.

लातूरमध्ये 14,687 विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

गेल्या वर्षीच्या नीट पेपरफुटी प्रकरणानंतर यंदा परीक्षा प्रक्रियेवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे आणि लातूर या संवेदनशील परीक्षा केंद्रांवर विशेष लक्ष ठेवण्याचे निर्देश दिल्यानंतर प्रशासनाने सुरक्षा व्यवस्थेत आणखी वाढ केली आहे. लातूर जिल्ह्यातील 26 परीक्षा केंद्रांवर एकूण 14 हजार 687 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. प्रत्येक केंद्रावर सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असून आरोग्य पथके, ड्युटी मॅजिस्ट्रेट तसेच स्टेट ऑब्झर्व्हर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येऊ नये तसेच परीक्षा शांततापूर्ण वातावरणात पार पडावी, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत. परीक्षा केंद्रात विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय... अल्पोपहार फळे आणि ज्यूस. तसेच, वैद्यकीय सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्यात आल्याची माहिती महाविद्यालय प्रशासनाने दिली.

यवतमाळमध्येही कडक बंदोबस्त

नीट पेपर फुटीचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर तीन मे रोजी घेण्यात आलेली परीक्षा रद्द करण्यात आली होती. त्यानंतर आता ही परीक्षा आज दुपारी 2 ते 5.15 या वेळेत यवतमाळ शहरातील एकूण 13 केंद्रावर परीक्षा घेण्यात आली. त्यामुळे, शहरातील 2 हजार 847 विद्यार्थ्यांचे भविष्य ही नीट परीक्षा ठरविणार आहे. नीट युजी फेरपरीक्षा दरम्यान कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडणार नाही, यासाठी यंत्रणा अलर्ट मोडवर दिसून आली. प्रत्येक परीक्षा केंद्रावर पोलिसांचा तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला होता, तर पथकाकडून विद्यार्थ्यांची सुरक्षा तपासणी करण्यात आली.

पुनर्परीक्षेदरम्यान फ्लश टँकमध्ये मोबाईल लपवला

परीक्षेत कॉपीचा प्रयत्न करणाऱ्या १८ वर्षीय विद्यार्थ्याला अटक



■नाशिक। प्रतिनिधी,

हैदराबादमध्ये नीट-यूजी २०२६ पुनर्परीक्षेदरम्यान कॉपी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या १८ वर्षीय विद्यार्थ्याला पोलिसांनी अटक केली आहे. परीक्षा केंद्रातील स्वच्छतागृहाच्या फ्लश टँकमध्ये मोबाईल लपवून त्याद्वारे उत्तरं शोधण्याचा प्रयत्न करताना तो रंगेहात पकडला गेला. ही घटना आदिबतला पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रगन्नागुडा येथील जिल्हा परिषद उच्च माध्यमिक शाळेत रविवारी घडली. विशेष म्हणजे, परीक्षा केंद्रावर कडक सुरक्षा व्यवस्था आणि अनेक स्तरांवरील तपासणी असतानाही विद्यार्थ्याने ही युक्ती आखल्याचे तपासात समोर आले आहे.

पोटदुखीचे कारण सांगून गेला स्वच्छतागृहात

परीक्षा सुरू असताना विद्यार्थ्याने पोटदुखीचा त्रास होत असल्याचे सांगत स्वच्छतागृहात जाण्याची परवानगी मागितली. मात्र बराच वेळ उलटूनही तो परत न आल्याने पर्यवेक्षकांना संशय आला. यानंतर कर्मचाऱ्यांना तपासणीसाठी पाठवण्यात आले. त्यावेळी संबंधित विद्यार्थी स्वच्छतागृहात मोबाईलच्या मदतीने उत्तरं शोधत असल्याचे आढळून आले. याची माहिती तत्काळ केंद्रावर तैनात पोलिसांना देण्यात आली आणि मोबाईल जप्त करण्यात आला.

गुगलवर शोधत होता उत्तरं

प्राथमिक तपासात विद्यार्थी मोबाईलमधील गुगल क्रोम ब्राउझरचा वापर करून प्रश्नांची उत्तरं शोधत असल्याचे समोर आले आहे. मोबाईलमध्ये कोणतेही विशेष कॉपी ॲप आढळले नसून इन्स्टाग्रामसह काही नियमित वापरातील ॲप्स असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

गुन्हा दाखल

चौकशीदरम्यान विद्यार्थ्याने कॉपीचा प्रयत्न केल्याची कबुली दिल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. शाळा प्रशासनाच्या तक्रारीवरून त्याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) तसेच सार्वजनिक परीक्षा (अनुचित साधनांचा प्रतिबंध) कायदा, २०२४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

परीक्षेपूर्वीच आखला कट

हैदराबाद शहर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अचमपेट येथील रहिवासी असलेल्या या विद्यार्थ्याने आधीच कॉपीचा कट रचला होता. सकाळी सुमारे ७ वाजता तो परीक्षा केंद्र परिसरात पोहोचला आणि शाळेच्या भिंतीलगत असलेल्या व्हेंटिलेटरमधून त्याने मोबाईल आत लपवून ठेवला. त्यानंतर परीक्षा सुरू होण्यापूर्वी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास त्याने तो मोबाईल पुन्हा घेतला. मोबाईल झिप-लॉक कव्हरमध्ये ठेवून स्वच्छतागृहातील फ्लश टँकमध्ये लपवण्यात आल्याचा आरोप आहे.

अडीच वर्षांत महाराष्ट्रातून ३,५४१ बांगलादेशी घुसखोरांची हकालपट्टी



■मुंबई। प्रतिनिधी,

वर्ष २०२४ पासून आजपर्यंत म्हणजेच गेल्या अडीच वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्रातून तब्बल ३ हजार ५४१ बांगलादेशी घुसखोरांना हुडकून काढून त्यांची पुन्हा बांगलादेशात हकालपट्टी करण्यात आली आहे. याशिवाय, अद्यापही राज्यात मोठ्या संख्येने बांगलादेशी नागरिक बेकायदेशीरपणे वास्तव्यास असून, त्यातील काही जणांवर सध्या विविध न्यायालयांमध्ये कायदेशीर खटले प्रलंबित आहेत.

बांगलादेशी घुसखोर केवळ राज्यात बेकायदेशीरपणे वास्तव्य करण्यासोबतच भारतीय नागरिकांसाठी असलेल्या विविध शासकीय योजनांचा लाभ घेत असल्याचे समोर आले आहे. राज्याच्या दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) सखोल तपास करून अशा संशयित बांगलादेशी घुसखोरांच्या नावांची एक सविस्तर सूची राज्य सरकारकडे सुपूर्द केली आहे. या यादीच्या आधारे हे घुसखोर रेशनिंग, घरे किंवा इतर सबसिडी लाटत आहेत का, याचा शोध घेण्याचे आदेश देण्यात आले होते. अन्न आणि नागरी पुरवठा विभागाने राज्यातील सर्व जिल्ह्यांतील जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना ही यादी पाठवून तपास करण्याचे निर्देश दिले होते.

ही यादी पाठवून आता वर्षभराचा कालावधी पूर्ण झाला आहे. असे असतानाही, राज्यातील एकाही जिल्ह्यातील पुरवठा विभागाने या घुसखोरांनी रेशन लाटले आहे की नाही, याचा कोणताही आढावा किंवा अहवाल राज्य सरकारकडे सादर केलेला नाही. प्रशासकीय पातळीवरील या विलंबाबाबत विचारले असता, गृहराज्यमंत्री (शहरे) योगेश कदम यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. या प्रकरणी सर्व संबंधित विभागांकडून तात्काळ सविस्तर माहिती आणि अहवाल मागवण्याच्या सूचना आपण प्रशासनाला दिल्या असल्याचे मंत्री कदम यांनी स्पष्ट केले.

अहमदाबादहून चोरीस गेलेली कार जळगावात जप्त

■जळगाव। प्रतिनिधी,



गुजरातमधील अहमदाबाद येथून चोरीस गेलेली सुमारे ९ लाख रुपये किमतीची कार जळगाव पोलिसांनी थरारक पाठलाग करून जप्त केली. एमआयडीसी पोलिसांनी कारचालकाला ताब्यात घेतल्यानंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ही कार गुजरात पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आली. अहमदाबाद ग्रामीण हद्दीतील बोपल पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातून १५ एप्रिल रोजी ही कार चोरीला गेली होती. याप्रकरणी तेथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, १८ जून रोजी सायंकाळी ही चोरीची कार जळगावच्या दिशेने येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार वाहतूक शाखेच्या पथकाने काशिनाथ चौक येथे नाकाबंदी केली. पोलिसांनी वाहन थांबविण्याचा इशारा दिल्यानंतरही चालकाने कार न थांबवता ती भरधाव वेगाने अजिंठा चौफुलीकडे पळवली. पोलिसांनी तत्काळ पाठलाग करून अजिंठा चौफुली येथे कार अडवली आणि चालकाला ताब्यात घेतले.



संपादकीय


संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

केवळ कठोर शिक्षेने अत्याचार थांबणार कसे?

कोणतीही स्त्री कुठल्याही ठिकाणी, कसल्याही कपड्यांत मुक्तपणे, आत्मविश्वासाने, सुरक्षितपणे वावरू शकेल अशी परिस्थिती केवळ कडक शिक्षेने नव्हे, तर समाजाने स्वतःच्या मानसिकतेत बदल घडवल्यावरच अस्तित्वात येऊ शकते.

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथील साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर एका ६५ वर्षे वयाच्या नराधमाने पाशवी अत्याचार करून, दगडाने ठेचून अत्यंत निर्घृणपणे तिची हत्या केली होती. ही घटना उजेडात आल्यावर राज्यभर सर्व स्तरांतून विविध मार्गांनी तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. त्या आधी बदलापूर येथेही एका चार वर्षीय मुलीवर एका नराधमाने अत्याचार केला होता तेव्हाही लोक खवळून उठले होते आणि आंदोलन केले होते. असे काही घडले की अत्याचाऱ्याला भर चौकात फाशी द्या, त्याला दगडाने ठेचून मारा, त्याचे इंद्रिय कापा, त्याचा एन्काऊंटर करा, त्याला आमच्या ताब्यात द्या... अशा संतप्त मागण्या लोकांमधून येत राहतात. लोक संतप्त होणे रास्तच आहे. परंतु अशा प्रकारच्या कडक शिक्षा दिल्याने खरोखरच अत्याचार कमी होणार आहेत का? अत्याचार होऊ नयेत यासाठी समाज काय करतो? या विषयावर हा एक दृष्टिक्षेप. महिलांवरील अत्याचाराची अत्यंत अमानुष अशी घटना २९ सप्टेंबर २००६ रोजी महाराष्ट्रातील खैरलांजी येथे घडली होती. या घटनेत भोतमांगे माय-लेकींवर केलेले अत्याचार अंगावर काटा आणणारे होते. त्यानंतर दिनांक १६ डिसेंबर २०१२ रोजी दिल्लीत एका २३ वर्षीय विद्यार्थिनीवर चालत्या बसमध्ये सामूहिक अत्याचार करून अत्यंत क्रूरतेने तिच्यावर अत्याचार करण्यात आले. त्यानंतर तेरा दिवस मृत्यूशी झुंज देऊन ती 'निर्भया' मृत्युमुखी पडली. त्या घटनेने देश ढवळून निघाला. अत्याचार करणाऱ्यांना अत्यंत कडक शिक्षा केली जावी म्हणून सर्वत्र तीव्र आंदोलने झाली. परिणामी, महिलांच्या सुरक्षेबाबत कडक कायदे करण्यात आले आणि क्रूर अत्याचाऱ्यांना कॅपिटल पनिशमेंट, म्हणजे मृत्युदंडाच्या शिक्षेची तरतूद सुद्धा करण्यात आली. मग, प्रश्न असा पडतो की एवढ्या कडक शिक्षेची तरतूद केल्यानंतर सुद्धा अत्याचारांचे प्रमाण आणि त्यातील हिंस्त्रता दिवसेंदिवस वाढत का आहे? दोनच दिवसांपूर्वी, तमिळनाडूत तिरुवल्लुर येथे एका तीन वर्षाच्या मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची आणि त्यात तिचा मृत्यू झाल्याची बातमी आली आहे. याचा अर्थ असा निघू शकतो, की अत्याचार करू पाहणाऱ्या पुरुषांवर कठोर शिक्षेचा फारसा परिणाम होत नाही. उलट आपल्या वासनेची शिकार झालेल्या स्त्रीला थेट मारून टाकून त्या गुन्ह्यातील तक्रारदार आणि महत्त्वाचा प्राथमिक साक्षीदारच एक प्रकारे तो नष्ट करून टाकतो. शिवाय फाशी होऊन मरायचेच आहे, तर त्या स्त्रीला मारूनच मरणे तो योग्य समजतो, असे गेल्या काही काळातील अशा गुन्ह्यांच्या वाढत्या संख्येवरून लक्षात येऊ लागले आहे. आपण कठोर शिक्षेची मागणी करतो आणि सरकार कठोर शिक्षेची तरतूद करते तेव्हा ही तरतूद अत्याचार झाल्यानंतरची आहे. अशा शिक्षेने पीडित स्त्रीला खरोखरच न्याय मिळतो का? जी स्त्री अशा गुन्ह्यात मृत्युमुखी पडते तिला न्याय मिळालाय हे तिला कळू शकत नाही. जी स्त्री जिवंत राहते तिला न्याय मिळाल्याचे तेवढ्यापुरते समाधान असले तरी त्यानंतरचे तिचे आयुष्य, भावविश्व उद्ध्वस्त झालेले असते. आयुष्यभर तिला याच्या यातना भोगाव्या लागतात. मग संबंधित गुन्हेगाराला कितीही कडक शिक्षा केली तरी तिला खरोखरीच न्याय मिळाला असे कसे म्हणता येईल? म्हणून, स्त्रियांची हीच अपेक्षा असणार की आपल्यावर अत्याचार होऊ नयेत. निदान अशा गुन्ह्यांना बऱ्यापैकी पायबंद तरी बसावा. यासाठी आपल्या समाजाची किंवा व्यवस्थेची भूमिका काय आहे? प्रतिबंधक उपाय काय आहेत? या प्रश्नांची उत्तरे आणि प्रतिबंधक उपाय शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न समाजाने, धर्माने, शासकीय व्यवस्थेने केला असल्याचे दिसत नाही. झाला अत्याचार की करा कठोर शिक्षेची मागणी, यापलीकडे आपण जात असताना दिसत नाही. मग, गुन्हेगाराला कठोर शिक्षा द्या म्हणून गळे काढणारा समाज वास्तवात काय करतो? तो अत्याचार पीडितेला सन्मानपूर्वक स्वीकारत नाही, तर एक कलंकित, 'तोंड दाखवायला जागा नसलेली', अब्रू लुटली गेलेली, स्त्री म्हणून सामान्यतः तिच्याकडे पाहतो. जे झाले त्यामागे तिचीच काहीतरी चूक शोधण्याचा प्रयत्न करतो. तिच्या कपड्यांची लांबी-रुंदी मोजतो. ती रात्री अमुक वाजता घराबाहेर कशी, असा प्रश्न उपस्थित करतो. गेल्या काही काळात तर अन्य धर्मीय स्त्री ही अत्याचार करण्यासाठीच असते अशी नवीन धारणा स्थापित होते की काय अशी भीती वाटू लागली आहे. 'त्यांच्या' स्त्रीवर अत्याचार करणारा तुरुंगातून बाहेर आल्यावर त्याचे हारतुरे देऊन स्वागत देखील केले जात असल्याने 'अन्य' धर्मीय स्त्रीवर अत्याचार करण्यास आता धार्मिक कृत्याचा दर्जा प्राप्त होऊ लागला आहे. एवढेच नाही, तर कित्येक भोंदूबाबा महिला अनुयायांवर आपल्या मंत्र-तंत्र शक्तीचे भय दाखवून अत्याचार करत असतात. अशा कृत्यांबद्दल तुरुंगवास भोगणाऱ्या बाबांच्या सुटकेसाठी चक्क महिलाच आंदोलन करताना दिसतात तेव्हा त्यांच्या गुलामी मानसिकतेची कीव येते. ही परिस्थिती अत्याचारास थेट प्रोत्साहन देणारी आहे. समाजात याबाबतीत झालेला दुसरा अत्यंत वाईट बदल म्हणजे अत्याचाराचा निषेध करणे आता धर्म-जात-पक्ष सापेक्ष झाले आहे ('नवशक्ति' दि. १५.०१.२०२६ : 'स्त्रियांवरील अत्याचारांच्या विरोधातील सापेक्षता' लेख वाचावा). म्हणजे अत्याचारी किंवा पीडिता हे कोणत्या जात-धर्म-पक्षीय बांधिलकीचे आहेत त्यानुसार निषेध करणे किंवा न करणे ठरते. अशा दुटप्पी वृत्तीमुळे अत्याचार होणे अपरिहार्यच आहे हे समाज मान्य करतो असे सिद्ध होत नाही का? मग अत्याचार थांबणे किंवा कमी होणे कसे शक्य आहे? आपला देश अत्याचारमुक्त करायचा असेल, आपल्या देशातील महिलांना सर्वत्र मुक्तपणे आणि सुरक्षितपणे आपल्या संचारस्वातंत्र्याचा अधिकार उपभोगता आला पाहिजे असे समाजाला प्रामाणिकपणे वाटत असेल, तर समाजाने आपली मानसिकता बदलली पाहिजे. त्यासाठी सुरुवात आपल्या घरातून केली पाहिजे. मुला-मुलींना लैंगिक समानता शिकवली पाहिजे. मुलींचा, महिलांचा, मग त्या कोणत्याही जाती-धर्माच्या असोत, आदर करणे, लहानपणापासून मुलांवर ठसवले पाहिजे. स्त्री ही एक उपभोग्य वस्तू नसून आपल्यासारखीच सर्व अधिकार असलेली व्यक्ती आहे हे शिकले-शिकवले पाहिजे. पीडितेविषयी समाजाचा दृष्टिकोन स्नेहाचा आणि सद्भावाचा असला पाहिजे. गुन्हेगार पुरुष कोणत्याही जाती-धर्माचे-पक्षाचे असोत, त्यांच्याबाबतीत कसलीही दयामाया न दाखवता सार्वत्रिक रूपात कठोरता दाखवली पाहिजे आणि त्यासाठी कोणता धर्म धोक्यात आहे यापेक्षा सर्वधर्मीय-जातीय स्त्रिया धोक्यात आहेत हे प्रामाणिकपणे मान्य केले पाहिजे. हा बदल वेळखाऊ असेल. पण सुरुवात तर केली पाहिजे. थोडक्यात, दिवसाच्या कोणत्याही वेळी, कोणतीही स्त्री, कुठल्याही ठिकाणी, कसल्याही कपड्यांत मुक्तपणे, आत्मविश्वासाने, सुरक्षितपणे वावरू शकेल अशी परिस्थिती केवळ कडक शिक्षेने नव्हे तर समाजाने स्वतःच्या मानसिकतेत बदल घडवल्यावरच अस्तित्वात येऊ शकते. याचा अर्थ कठोर शिक्षा नकोत असा नाही. कठोर शिक्षा हवीच, परंतु त्या आधी समाजाच्या, व्यवस्थेच्या मानसिकतेत बदल हवाच.

जनादेशाचा बाजार, संविधानावर घाव



महाराष्ट्रातील आणि देशातील अलीकडील घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आज एक मूलभूत प्रश्न आपल्यासमोर उभा आहे तो म्हणजे आपण लोकशाही अधिक मजबूत करणार आहोत की ह्यऑपरेशनह्णच्या राजकारणातून तिचे वस्त्रहरण होत असताना मूक प्रेक्षक बनून राहणार आहोत?

लोकशाही ही केवळ निवडणुकांची प्रक्रिया नसते; ती जनतेने व्यक्त केलेल्या विश्वासाची आणि जनादेशाच्या पवित्रतेची व्यवस्था असते. मतदार आपल्या मताच्या माध्यमातून केवळ एखाद्या व्यक्तीला निवडून देत नाहीत, तर विशिष्ट विचारसरणी, धोरणे, नेतृत्व आणि राजकीय कार्यक्रमालाही मान्यता देत असतात. त्यामुळे निवडणुकीनंतर जनतेने दिलेल्या कौलाचा सन्मान राखणे ही प्रत्येक लोकप्रतिनिधी आणि राजकीय पक्षाची नैतिक तसेच संविधानिक जबाबदारी असते. परंतु जेव्हा पैसा, सत्तेच्या लालसेपोटी, पदांच्या मोहापायी आणि इतर प्रलोभनांच्या आधारे निवडून आलेल्या प्रतिनिधींची फोडाफोड केली जाते, तेव्हा हा लोकशाहीच्या आत्म्यावर घातलेला कठोर घाव असतो.

महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत घडलेल्या राजकीय घडामोडी आणि सध्या चर्चेत असलेले 'ऑपरेशन टायगर' हे याच चिंताजनक प्रवृत्तीचे प्रतीक आहे. निवडणुकीच्या वेळी एका विचारसरणीच्या, आघाडीच्या नावावर मते घेऊन निवडून यायचे त्यानंतर प्रचंड पैसा घेऊन विरुद्ध विचारांच्या सत्ताधारी पक्षाच्या वळचणीला जाऊन सत्तेचा मलिदा खायचा, हा केवळ पक्षांतराचा प्रश्न नाही. ही फक्त जनादेशाशी केलेली प्रतारणा नसून मतदारांच्या पाठीत खंजीर खुपसून लोकशाहीला बाजारपेठेत रूपांतरित करण्याचा धोकादायक प्रयत्न आहे.

लोकशाही की 'ऑपरेशन' संस्कृती?

गेल्या काही वर्षांत भारतीय राजकारणात 'ऑपरेशन' नावाचा एक नवीन शब्दप्रयोग रूढ झाला आहे. कधी 'ऑपरेशन लोटस', तर कधी 'ऑपरेशन टायगर'च्या नावाखाली अनैतिक मार्गाने सत्तेची गणिते बदलण्यासाठी असंविधानिक मोहिमा राबविल्या जातात. कर्नाटक, मध्य प्रदेश, गोवा, अरुणाचल प्रदेश, मणिपूर आणि महाराष्ट्र यांसारख्या राज्यांमध्ये निवडणुकांनंतर आमदार-खासदारांच्या फोडाफोडीतून सत्तांतर झाल्याची उदाहरणे देशाने पाहिली आहेत. लोकशाहीत सरकारे जनतेच्या मतांनी बदलली पाहिजेत; ती जर अनैतिक, असंविधानिक राजकीय व्यवहारांनी बदलत असतील तर निवडणुकांना आणि लोकशाहीला अर्थच उरत नाही. जर निवडणुकीनंतर काही लोकप्रतिनिधींना कोट्यवधी रुपयांत खरेदी करून जनादेशाचे गणित बदलता येत असेल, तर निवडणुका घेण्याचे औचित्य काय? मतदानासाठी रांगेत उभ्या राहणाऱ्या सामान्य नागरिकाच्या मताचे मूल्य काय?

दहावी अनुसूची : जनादेशाच्या संरक्षणासाठीचा कायदा

पक्षफोडीचे राजकारण रोखण्यासाठी आणि जनतेने दिलेल्या कौलाचे संरक्षण करण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली १९८५ मध्ये संविधानात दहावी अनुसूची अर्थात पक्षांतरबंदी कायदा समाविष्ट करण्यात आला. १९६० आणि ७० च्या दशकात वाढलेल्या 'आयाराम-गयाराम' संस्कृतीमुळे निवडून आलेली सरकारे अस्थिर होत होती आणि लोकशाही संस्थांवरील जनतेचा विश्वास डळमळीत होत होता. या पार्श्वभूमीवर जनादेशाचा सन्मान राखणे आणि लोकप्रतिनिधींची खरेदी-विक्री रोखणे हा या कायद्याचा मूलभूत उद्देश होता. मात्र गेल्या काही वर्षांतील राजकीय घडामोडींमुळे पक्षांतरबंदी कायद्याच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. राज्यपाल, विधानसभा अध्यक्ष, लोकसभा अध्यक्ष यांसारख्या घटनात्मक पदांवरून दिल्या जाणाऱ्या निर्णयांतील विलंब, अपात्रतेच्या प्रकरणांवर कारवाई न होणे आणि न्यायालयीन प्रक्रियेचा प्रदीर्घ कालावधी यामुळे जनादेशाचे संरक्षण करण्याऐवजी चोरीला मोकळे रान दिले जात आहे.

इतिहासाचे इशारे

भारतीय राजकारणात पक्षफोडीची परंपरा नवीन नाही. १९६७ मध्ये हरयाणातील आमदार गया लाल यांनी एका दिवसात तीन वेळा पक्ष बदलल्याने 'आयाराम-गयाराम' हा शब्द भारतीय राजकारणात प्रसिद्ध झाला. त्यानंतर अनेक राज्यांतील सरकारे आमदारांच्या फोडाफोडीतून कोसळली. या अनुभवांतूनच पक्षांतरबंदी कायद्याची निर्मिती झाली. परंतु आजची परिस्थिती अधिक गंभीर आहे. पूर्वी काही आमदार पक्ष बदलत असत; आता संपूर्ण पक्षच चोरला जातो. असंविधानिक अनैतिक मार्गांनी नाव, चिन्ह यांची मालकी मिळवली जाते.

लोकशाहीचे वस्त्रहरण

महाभारतातील द्रौपदी वस्त्रहरण हा केवळ एका स्त्रीच्या अपमानाचा प्रसंग नव्हता. तो सत्ता, अहंकार आणि नैतिक अधःपतनाच्या पराकाष्ठेचे प्रतीक होता. त्या वेळी सभागृहात अनेक ज्येष्ठ, विद्वान आणि सामर्थ्यवान व्यक्ती उपस्थित होते, पण ते अन्यायाविरोधात उभे राहिले नाहीत. त्यांच्या मौनामुळे अन्यायाला बळ मिळाले. आजही तीच परिस्थिती आहे. जनादेशाची पायमल्ली होत असताना संविधानिक संस्थांची भूमिका, निर्णय प्रक्रियेतील विलंब आणि राजकीय नैतिकतेच्या अभावामुळे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत राजकीय वास्तव बदललेले असते. लोकशाहीला सर्वात मोठा धोका एखाद्या एका निर्णयातून नसतो, तर संस्थांच्या मौनातून, नैतिकतेच्या ऱ्हासातून आणि नागरिकांच्या उदासीनतेतून निर्माण होतो.

न्यायालयाच्या विलंबाने फुटीला बळ

महाराष्ट्रातील अलीकडील राजकीय घडामोडींनी पुन्हा एकदा जनादेश, राजकीय निष्ठा आणि लोकशाहीच्या स्थैर्याबाबत प्रश्न निर्माण केले आहेत. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सहा खासदार फुटले. या पक्षात सत्ताधाऱ्यांनी दुसऱ्यांदा फूट पाडली. पहिल्या फुटीबाबत अद्याप कोटार्ने निकाल दिलेला नाही तोपर्यंत ही दुसरी फूट आहे. पहिल्या प्रकरणाचा निकाल आला असता तर दुसऱ्या फुटीला बळ मिळाले नसते. लोकशाहीत विरोधी पक्ष हा जनतेच्या प्रश्नांना आवाज देणारा अत्यावश्यक घटक असतो. परंतु विरोधी पक्षांच्या लोकप्रतिनिधींना कोट्यवधी रुपये खर्च करून खरेदी करणे आणि त्यांचे अस्तित्व संपवणे हे जर यशस्वी राजकारणाचे मापदंड बनले, तर ती लोकशाही राहात नाही.

फक्त जनादेशाचा नाही जनतेचा अपमान

लोकशाहीत प्रत्येक लोकप्रतिनिधीला स्वतःची भूमिका बदलण्याचा अधिकार आहे. परंतु हा अधिकार जनतेने दिलेल्या जनादेशापेक्षा मोठा असू शकत नाही. मतदार केवळ व्यक्तीला मतदान करत नाहीत; ते पक्ष, विचारसरणी आणि नेतृत्वालाही समर्थन देत असतात. शिवसेनेच्या सहा फुटीर खासदारांना काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या मतदारांनी मतदान केलेले आहे. या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी त्यांचा प्रचार केला आहे. त्यामुळे त्यांनी पक्ष बदलताना नैतिकदृष्ट्या राजीनामा देऊन पुन्हा निवडणुकीला सामोरे गेले पाहिजे. एवढी एवढी नैतिकता आणि धाडस त्यांच्यात नाही.

लोकशाही वाचवायची की केवळ सत्ता?

आजचा प्रश्न कोणत्या एका पक्षाचा नाही. तो भारतीय लोकशाहीच्या भविष्याचा आहे. जर निवडणुकांनंतर कोट्यवधी रुपयांत आमदार-खासदारांची खरेदी, पक्ष, चिन्ह यांची चोरी हीच नवी राजकीय संस्कृती बनली, तर लोकशाहीवरील जनतेचा विश्वास संपेल. मतदारांनी दिलेला कौल हा अंतिम लोकशाही निर्णय न राहता, शेअर बाजारातील समभागाप्रमाणे विकत घेता आणि विकता येणारी वस्तू बनण्याचा धोका निर्माण होईल. अशा परिस्थितीत निवडणूक ही जनतेच्या सार्वभौम इच्छेची अभिव्यक्ती न राहता सत्तेच्या सौद्यांचा एक औपचारिक कार्यक्रम ठरेल.

लोकशाहीची खरी ताकद निवडणुकीत नसते; ती जनादेशाच्या सन्मानात असते. सत्ता मिळवणे हे राजकारणाचे उद्दिष्ट असू शकते, परंतु लोकशाहीचे संरक्षण करणे ही राजकीय पक्ष, लोकप्रतिनिधी आणि घटनात्मक संस्थेची जबाबदारी आहे. देशातील अलीकडील घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आज एक मूलभूत प्रश्न आपल्यासमोर उभा आहे तो म्हणजे आपण लोकशाही अधिक मजबूत करणार आहोत की 'ऑपरेशन'च्या राजकारणातून तिचे वस्त्रहरण होत असताना मूक प्रेक्षक बनून राहणार आहोत?

ही राष्ट्राच्या भविष्यासाठी धोक्याची घंटा!



महाराष्ट्रातील पक्षफुटीच्या राजकारणाच्या चर्चा चवीने पाहिल्या जात असतांना जालना येथील शाळेत मुलांनी केलेल्या अथवा त्यांच्याकडून करून घेतलेल्या हिंसक आणि आतंकवादाचे समर्थन करणाऱ्या नृत्याकडे दुर्लक्ष होता कामा नये. ते झाल्यास शाळांचे रूपांतर 'हिंसा शिकवणारी आतंकवादी केंद्रे' झाल्याचे पहायला मिळेल. जालना येथील 'किड्स वर्ल्ड इंग्लिश स्कूल' या शाळेत हातात तलवारी मिरवत 'गुस्ताख-ए-नबी की एक ही सजा, सर तन से जुदा' या गाण्यावर शाळेतील मुलांनी नाच केला. या वेळी मंचाच्या मागच्या पडद्यावर पाकिस्तानी आतंकवादी मुमताज कादरी याचे छायाचित्र झळकत होते. घटना पाकिस्तानातील नाही, भारतातील आणि त्यातही महाराष्ट्रातील आहे. जिहादी आतंकवाद गावात येऊन ठेपल्याचे संकेत मिळेपर्यंत तो शाळांमध्ये जाणाऱ्या मुलांनाही शिकवला जाऊ लागला आहे, याचे हे प्रत्यक्ष उदाहरण आहे.

उदयपूरमध्ये महंमद रियाझ आणि गौज महंमद यांनी कन्हैय्यालाल यांची हत्या जे भयानक वाक्य म्हणत केली, ज्या घटनेचा व्हिडिओ पाहून उभा देश भयाने थक्क झाला, त्याच ओळी मुलांच्या तोंडी हातात तलवारीसह आलेल्या आहेत! म्हणजे 'जिहादी आतंकवादाचे बीज घरोघरी पेरले जात आहे', असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. आजही ज्या देशातील सामान्य नागरिक गणवेशातील कायद्याकडे पहातांना आदरयुक्त भीती बाळगतो, त्या देशात ईशनिंदेची शिक्षा म्हणून थेट 'सर तन से जुदा' ही शिकवण मुलांना देऊन त्यांना उद्याचे महंमद रियाझ आणि गौज महंमद बनवण्याचे शिक्षण कोण देत आहे? मुलांना भविष्यात हत्या करण्यासाठी कोण सिद्ध करत आहे? आणि का करत आहे? याचे उत्तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महाराष्ट्र सरकार यांनी शोधून काढलेच पाहिजे.

मदरसे नाही, आता इस्लामी विचार शाळा!

या प्रकरणी मुसलमान मुख्याध्यापक वझिरुद्दीन महंमद तारिक सिद्दीकी, शिक्षक तारिक अब्दुल गनी, संचालक उस्मान यांच्यावर गुन्हा नोंद करून अटक केली गेली आहे. ज्या शाळेतील ही घटना आहे, त्या शाळेची माहिती देणारे 'इन्स्टाग्राम' खाते बंद असले, तरी 'सी.बी.एस्.सी. पॅटर्न इंग्लिश स्कूल ऑफ इस्लामिक थॉट्स' अशी या शाळेची जुनी ओळख इंटरनेटवर अद्यापही दिसत आहे. इस्लामी विचारांच्या अधीन असलेल्या शाळा मदरशांसारख्याच असतात, अशी शितावरून भाताची परीक्षा केल्यास देशात इस्लामी विचारसरणीच्या अशा कितीतरी शाळा चालतात, हे आपल्या लक्षात येईल. त्यांची आकडेवारी आणि प्रत्येक शाळेत हेच शिकवले जाण्याची शक्यता अधिक असल्याने अशा सर्व शाळा सरकारच्या 'रडार'वर असल्या पाहिजेत. सरकार अथवा प्रशासन शाळांची नोंदणी करून नंतर 'तेथे काय शिकवले जात आहे?', याकडे पहात नाही, हेही या घटनेतून समोर येते.

आतापर्यंत मदरशांमधून कट्टरतेचे शिक्षण दिले जात असल्याचे सर्वांनी पाहिले आणि ऐकले आहे. मदरसे आतंकवाद्यांचे आश्रयस्थान असल्याच्या घटना समोर आल्यानंतर देशात काही ठिकाणी मदरशांवर कारवाई झाली आणि आतंकवाद्यांना कार्य करणे अवघड झाले; म्हणूनच आता नाव पालटून आणि सरकारी अभ्यासक्रमाच्या आडून कट्टरतेचे शिक्षण चालू ठेवण्याची अशी नवी मेख जिहादी आतंकवाद्यांनी शोधून काढली आहे. न जाणो असे आणखी किती आणि कोणते प्रकार देशाला अन् हिंदूंना खिळखिळे करण्यासाठी चालू आहेत?

नुकताच हिंदुत्वनिष्ठ लेखिका शेफाली वैद्य यांनी जालना येथीलच जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुलींनी बुरखा घालून 'मै परदा करती हूं' या गाण्यावर नाच केल्याचा व्हिडिओ प्रसारित केला. सरकारी शाळांमध्ये गीता शिकवली जाऊ नये, यासाठी रान उठवणाऱ्या निधर्मीवाद्यांनी, कथित सर्वधर्मसमभाव प्रेमींनी यावर मौन बाळगले, यात शंका नाही; पण सरकारी शाळांमध्ये मुलींनी काळे बुरखे घालून बुरख्याची प्रशंसा करायला हा काही पाकिस्तान आहे का? हा प्रश्न तरी सरकारने, प्रशासनाने विचारला का?

'आजच्या मुलांच्या ओठांवर कोणती गाणी आहेत? त्यावर देशाचे भवितव्य ठरते', हे स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे वाक्य सुसंस्कृत भारतीय हिंदूंनी नाही, तर जिहाद्यांनी कृतीत आणले आहे. त्यासाठीच ते लहानपणीच मुलांमध्ये धर्मांधता, कट्टर जिहादी विचारसरणी रूजवत आहेत. हा प्रकार असाच चालू राहिला, तर 'पेराल, ते उगवेल' याप्रमाणे 'सर तन से जुदा'च्या घोषणा देणाऱ्या आतंकवाद्यांचे रानच देशात उगवेल. देहलीतील लाल किल्ल्याजवळ बाँबस्फोट करणारे आतंकवादी उच्चशिक्षित; परंतु जिहादी विचारसरणीचे होते, हे विसरता कामा नये. त्यांना धर्मांधता आणि कट्टरता यांची शिकवण लहानपणापासूनच दिली जाण्याची शक्यता असल्याने आतंकवादी आक्रमण करण्याचे त्यांचे धाडस झाले. जिहादी आतंकवाद्यांचे भारताला 'दारूल-ए-इस्लाम' बनवण्याचे स्वप्न पूर्ण होऊ द्यायचे नसेल, तर जालना येथील प्रकाराला मोठा विरोध होणे आणि देशभरातील प्रत्येक इस्लामी विचारसरणीशी निगडित केंद्राची चौकशी होईपर्यंत तो चालू ठेवणे, आवश्यक आहे.

निजामशाहीची मुळे उखडून टाका!

आज पक्षांची जोड-तोड होत असतांना मुलांच्या माध्यमातून भविष्यातील भारताची फाळणी होण्याची शक्यता आहे आणि जर देश तुटला, तर जगण्याची मारामार होणार असल्याने पक्षांचे अस्तित्वच रहाणार नाही, हे पक्षीय राजकारणात अडकलेल्यांनी लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे 'राज्याचे गृहमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस यांनी या गंभीर प्रकरणाकडे अधिक लक्ष द्यावे', अशी हिंदूंची अपेक्षा आहे.

रझाकारांना जन्म दिलेल्या निजामशाहीने भारतात विलीन होण्यास नकार दिला होता. त्यानंतर जे झाले, ते मराठवाडा मुक्तीसंग्राम म्हणून प्रसिद्ध आहे. स्वतंत्र भारतात विलीनीकरणानंतरही आज जालना येथे जो प्रकार घडला, त्यातून निजामशाहीची पाळेमुळे तेथे आजही जिवंत असल्याचे लक्षात येते. रझाकारांनी केलेला विध्वंस भारतीय इतिहासाला ज्ञात आहे, तो भविष्यातील भारताला भोगावा लागू नये, यासाठी सरकारनेच कंबर कसली पाहिजे. या पूर्ण प्रकरणामध्ये सरकारची भूमिका लक्षवेधी ठरणार आहे. अशी जिहादी विचारसरणी कुठल्या शाळांमध्ये प्रसारित केली जात आहे, हे लक्षात घेऊन सरकारने अशांवर कारवाई करण्यासाठी कंबर कसली पाहिजे. अन्यथा भारताचे भविष्य पुन्हा निजामशाहीच्या दिशेने लोटले न जाण्यासाठी हिंदू स्वतःच कंबर कसतील, हे नक्की!



अमेरिकेबरोबर करार करताना आपल्या आर्थिक, सामरिक आणि शेतीविषयक हितसंबंधांचे रक्षण करण्याचे आव्हान भारतासमोर आहे.



बर्फ वितळू लागला...

फ्रान्समधील 'जी-७' या प्रगत देशांच्या शिखर परिषदेच्या दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात झालेली चर्चा ही दोन्ही देशांतील संबंधांमधील तणाव दूर करण्यास उपयुक्त ठरू शकेल. या भेटीत ट्रम्प यांनी भारतावर आणि व्यक्तिशः मोदींवर स्तुतिसुमने उधळली; तसेच भारतावर हल्ला झाल्यास अमेरिका मदतीला धावून येईल, असे आश्वासनही दिले. मात्र, उद्या चीन किंवा पाकिस्तान यांनी भारतावर हल्ला केल्यास अमेरिका खरोखरीच मदतीला धावून येईल का, असा प्रश्न आहे. तसेही ट्रम्प यांच्या उक्तीत आणि कृतीत नेहमीच अंतर असते; त्यामुळे मोदींना आणि भारताला सुखावणारी वक्तव्ये त्यांनी केली असली, तरी आयातशुल्कापासून 'एचवन बी' व्हिसापर्यंत अनेक मुद्द्यांवरील ट्रम्प प्रशासनाची भारताबाबतची कठोर भूमिका लगेचच बदलेल, असे नाही. पंतप्रधान मोदी यांच्याशी वाटाघाटी करणे सोपे नसल्याचे उद्गार ट्रम्प यांनी काढले. प्रत्यक्षात ट्रम्प यांच्याशी वाटाघाटी करणे सोपे नसल्याचा अनुभव आहे. कोणताही करार करताना राष्ट्रप्रमुख आपल्या देशाच्या वाट्याला काय येईल हे पाहत असतो; परंतु अमेरिकेला पुन्हा महान बनविण्याच्या कल्पनेने पछाडलेले ट्रम्प आपल्या पदरात अधिकाधिक पाडून घेण्याच्या प्रयत्नात आहेत. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार कराराची प्रक्रिया दीर्घ काळ लांबण्याचे कारणही हेच आहे. अमेरिकी शेतीमालाला भारतीय बाजारपेठ खुली करण्यापासून भारताच्या इंधनखरेदीचा प्राधान्यक्रम बदलण्यापर्यंतचे मुद्दे या करारात असल्याने उभयपक्षी मान्य असा तोडगा अद्याप निघालेला नाही. मात्र, तो दृष्टिपथात असल्याचे संकेत मोदी-ट्रम्प यांच्या भेटीत दिले गेले. दक्षिण कोरिया, जपान आदी घट्ट मैत्री असलेल्या देशांबरोबरील व्यापार करारांत, या दोन्ही देशांनी अमेरिकेत मोठी गुंतवणूक करण्याला आणि इंधनाच्या खरेदीला मान्यता दिली होती. मोदी-ट्रम्प यांच्या भेटीला ताजी पार्श्वभूमी होती, ती पश्चिम आशियातील युद्धाची. या युद्धाची समाप्ती झाली असून, अमेरिका आणि इराण सहमती करारावर आता सह्या करतील. या युद्धाचा फटका अन्य देशांप्रमाणे भारताला बसलाच; सोबत जीवितहानीही सहन करावी लागली. होर्मुझच्या सामुद्रधुनीत अमेरिकेच्या क्षेपणास्त्र हल्ल्यात भारतीय जहाजावरील तिघांचा मृत्यू झाला. त्यावर देशात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. त्याबद्दल अमेरिकेने ना दिलगिरी व्यक्त केली, ना खंत. मोदींबरोबरील भेटीतही ट्रम्प यांनी याबाबत खंत व्यक्त केली नाही. होर्मुझच्या सामुद्रधुनीतील सागरी प्रवाशांच्या सुरक्षिततेबद्दलची चिंता पंतप्रधान मोदींनी ट्रम्प यांच्यासमोर उपस्थित केली. त्यावरील ट्रम्प यांची प्रतिक्रिया खेद दर्शविणारी नव्हती. मात्र, अमेरिकी परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांच्याप्रमाणे त्यांनी या प्रकरणी कठोर वक्तव्य केले नाही. अमेरिकी निर्बंधांचे उल्लंघन करून होणारी बेकायदा कृत्ये सहन केले जाणार नसल्याचे रुबियो यांनी म्हटले होते. आपण आठ युद्धे थांबविल्याचा दावा ट्रम्प यांनी पुन्हा एकदा केला; परंतु या वेळी त्यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील गेल्या वर्षीचे युद्ध थांबविल्याचा पुनरुच्चार केला नाही. गेल्या वर्षभरात ट्रम्प यांनी अनेकदा हा दावा केला असून, भारताने तो कधीच उचलून धरलेला नाही. मोदींबरोबरील भेटीत याचा उल्लेख न करून ट्रम्प यांनी एक प्रकारे भारतीयांच्या याबद्दलच्या भावनेची दखल घेतली. आयातशुल्क, रशियाकडून इंधनखरेदी, 'एचवन बी' व्हिसा, व्यापार करार, ट्रम्प यांची उलट सुलट वक्तव्ये आदींमुळे गेले वर्षभर भारत आणि अमेरिका यांच्यात तणाव निर्माण झाला होता. मोदी-ट्रम्प यांच्यातील चर्चेमुळे तो काही प्रमाणात कमी होऊ शकेल. एका अर्थाने बर्फ वितळू लागले, असे म्हणता येईल. दोन्ही देशांमधील संबंधांत मोठ्या प्रमाणावर वितुष्टता नाही. दोन्ही देशांचे परस्परांत हितसंबंधही आहेत. उच्च शिक्षणासाठी प्रतिभावान भारतीय विद्यार्थ्यांची पहिली पसंती अमेरिकेलाच आहे. अमेरिकेत मूळ भारतीय वांशिकांनी आपले एक स्थान निर्माण केले आहे. अमेरिकेला भारतीय बाजारपेठ खुणावते आहे. त्यामुळे दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ होण्यात उभयपक्षी हित आहे. मोदी-ट्रम्प चर्चेत अनेक मुद्दे आले. दोन्ही देशांमध्ये सर्वसमावेशक अशा

पेरूचे आरोग्यदायी सरबत

साहित्य : एक पिकलेला पेरू, दोन चमचे साखर (चवीनुसार), अर्धा इंच अद्रकाचा (आलं) तुकडा, चवीनुसार मीठ, अर्धा चमचा लिंबाचा रस, एक ते दीड कप पाणी थंड पाणी

कृती : पिकलेला पेरू धुवून त्याची साल काढावी. पेरूच्या फोडी करून घ्याव्यात. यानंतर या फोडी मिक्सरच्या भांड्यात टाकाव्यात. सोबत अद्रक, मीठ, लिंबाचा रस व एक कप थंड पाणी टाकून मिक्सर फिरवावे. हे सर्व मिश्रण गाळून घ्यावे... तुमच्यासाठी ताजे थंडगार सरबत तयार..



सुंदर लिप्ससाठी टिप्स !

आज प्रत्येक महिला लिपस्टिकचा वापर करत आहे. त्या आपल्या संपूर्ण जीवनकालात किमान ५ किलो लिपस्टिक पोटात टाकतात पण त्याचा आरोग्यावर काही विपरित प्रभाव पडत नाही असे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. लिप्सला जर हॉट बनवायचे असेल तर खाली दिलेल्या टिप्सचा वापर करावा.



तुम्हाला तुमचे आकर्षण कायम ठेवायचे असेल तर सर्वप्रथम तुम्हाला तुमच्या ओठांकडे लक्ष्य देण्याची गरज आहे. आज प्रत्येक महिला लिपस्टिकचा वापर करत आहे. त्या आपल्या संपूर्ण जीवनकालात किमान ५ किलो लिपस्टिक पोटात टाकतात पण त्याचा आरोग्यावर काही विपरित प्रभाव पडत नाही असे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. लिप्सला जर हॉट बनवायचे असेल तर खाली दिलेल्या टिप्सचा वापर करावा.

■ रोज ५ ते ६ ग्लास पाणी प्यायला पाहिजे. पाण्यामुळे फक्त शरीराला लागणारी पाण्याचीच पूर्ती पूर्ण होत नाही तर ओठांची नमी कायम राहते.

■ बऱ्याच लोकांना ओठांना चावायची सवय असते ती बदलायला पाहिजे. दीर्घ काळापर्यंत लिपस्टिकची चमक कायम ठेवण्यासाठी लिपस्टिक लावल्यानंतर टिशू पेपरने एक्स्ट्रा लिपस्टिक काढून घ्यावी. यामुळे लिपस्टिकची चमक पूर्ण दिवसभर कायम राहते.

■ डार्क कलरचे लिपस्टिक लिप्सला स्मॉल लूक देतात. जर तुमच्या ओठांचा आकार लहान असेल आणि त्याला मोठा लूक द्यायचा असेल तर नॅचरल कलरचे लिपस्टिक वापरायला पाहिजे.

■ जर ओठ जाड असतील तर कन्शिलर आणि फाऊंडेशनच्या मदतीने लिप्सला पातळ शेप देऊ शकता. लिप लायनरने आऊट लाइन ड्रॉ करावी आणि डार्क कलरचे लिपस्टिक त्यात भरायला पाहिजे.

■ जर लिप्सला हॉट लूक द्यायचा असेल तर स्ट्राबेरी आणि चेरी शेड्सचा लिपस्टिकसुद्धा लावू शकता.

■ बदलत्या मोसमाचा सर्वात जास्त प्रभाव ओठांवर पडतो. म्हणून नेहमी चांगल्या कंपनीचे लिप बाम दिवसातून दोन-तीन वेळा लावायला पाहिजे.

उन्हाळ्यात सोडा, पॅक्ड ज्यूस वगळून केवळ प्या पाणी

वजन कमी होतं

हल्लीच्या लाइफस्टाइलमध्ये सगळे वाढत असलेल्या वजनामुळे परेशान असतात. अशात वजन कमी करण्यासाठी शुगर असलेले पेय पदार्थ न पिता केवळ पाणी पिणे योग्य ठरेल. याने अधिक प्रमाणात कॅलरी बर्न होण्यात मदत मिळेल.

चयापचय क्षमता वाढेल

केवळ पाणी पिण्याने आपली चयापचय क्षमता वाढेल आणि यामुळे ऊर्जेचे स्तरदेखील. म्हणून दिवसभर खूप पाणी प्या. या व्यतिरिक्त अधिकाधिक पाणी पिण्याने आपल्याला ध्यान केंद्रित करण्यात देखील मदत मिळेल.

खाण्यावर नियंत्रण

आपली डाएट घेल्यानंतरही आपल्याला भूक जाणवत असेल तर केवळ एक ग्लास पाणी प्यावे. याने वजन नियंत्रित करण्यात मदत मिळेल. अनावश्यक कॅलरीज कमी करण्यासाठी पाणी पीत राहावे.

विषारी पदार्थ शरीरातून बाहेर काढते

अधिक पाणी पिण्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात. ज्यामुळे त्वचेचे आरोग्य उत्तम राहते आणि वय वाढले तरी तारुण्य टिकून राहते. या व्यतिरिक्त अनेक आजार हाय ब्लड प्रेशर, हृदयासंबंधी आजार आणि अपचन सारखे आजार होण्याचा धोका टळतो.



खानपानच्या ५ असंगत जोड्या सेवन करताना काळजी घ्या

खाण्या-पिण्याच्या भिन्न वस्तू आरोग्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे फायदा करतात. काही पदार्थ मिसळून खाल्ल्याने फायदा होतो तर काही पदार्थ असे आहेत जे सोबत खाल्ल्याने आरोग्यावर विपरित परिणाम होऊ शकतो. तर जाणून घ्या अशा ५ जोड्यांबद्दल, ज्याचे सेवन टाळावे.

आंबा आणि काकडी

उन्हाळ्यात आंबा आणि काकडी दोन्हीचे खूप सेवन केलं जातं, परंतु जेवताना दोन्ही सोबत खाणे आरोग्यासाठी नुकसानदायक ठरतं. आंबा एक फळ आहे तर काकडी भाजी म्हणून दोघांना पचनासाठी वेगवेगळ्या एनजाइम्सची गरज भासते, अशात दोन्ही सोबत खाल्ल्याने पचन संबंधी समस्या होऊ शकतात.

डेअरी प्रॉडक्ट्स आणि पालक

पालकासह डेअरी प्रॉडक्ट्समध्ये पनीर मिसळून तयार भाजी लोकं चव घेऊन खातात. परंतु डेअरी प्रॉडक्ट्समध्ये कॅल्शियम भरपूर प्रमाणात आढळतं आणि पालकात आढळणारे ऑक्सॅलिक ॲसिड शरीराला कॅल्शियम अवशोषित करण्यापासून थांबवतो. ज्यामुळे हे पदार्थ सोबत खाल्ल्याने फायदा होत नाही.

दूध आणि डाळी

अनेक पोषण विशेषज्ञाचे म्हणणे आहे की, दुधाचे पचन पोटाऐवजी छोट्या इन्टेस्टाइनमध्ये होतं आणि डाळीने तयार कोणते हा पदार्थ शरीर वेगळ्याने पचवतो. अशात दोन्ही सोबत खाल्ल्याने पचन क्रियेची गती कमी होते.

भोजनासह फिजी ड्रिंक्स

फिजी व काबोर्नेटेड ड्रिंक्समध्ये अती प्रमाणात साखर असते. हे भोजनासह घेतल्याने पचन प्रणाली वाईट रित्या प्रभावित होते. याने पचन क्रियेची गती कमी होते आणि सोबतच गॅस व ब्लॉटिंगसारख्या समस्या उद्भवू लागतात.

दूध आणि ॲंटीबायोटिक्स

ॲंटीबायोटिक औषध दुधासोबत घेतल्याने औषधांचा प्रभाव पडत नाही असे मानले जाते.

मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांचा आहार, देखरेख व पोषक वातावरण आदी महत्त्वपूर्ण गोष्टींची काळजी घ्यावी लागते. मात्र याव्यतिरिक्त बाळ तंदुरुस्त राहावे

बेबी मसाजचे फायदे माहीत आहेत का?

म्हणून बेबी मसाज लाभदायी असतो. मसाजमुळे मुलांची हाडे तंदुरुस्त होतात. शिवाय मुलाच्या बुद्धीलाही चालना मिळत असते. लहान मुलाच्या मसाजचा भारतीय आयुर्वेदातही उल्लेख आढळतो.



मसाजचे फायदे-

■ मसाजमुळे मुलाचे वजन वाढण्यास मदत होते.

■ दिवसभरातून किमान एक वेळा मसाज केल्याने मुलाचे स्नायू बळकट होतात.

■ मसाजमुळे मुलामधील एकाग्रता वाढते.

■ मुलाच्या पोट व पचनक्रियेसंबंधी व्याधी दूर होतात.

■ मसाजमुळे मुले व आई यांच्यात घनिष्टता वाढीस लागते.

■ मसाजमुळे मुलांना शांत झोप लागत असते.

■ मसाजमुळे मुलाचा शारीरिक व मानसिक विकास होत असतो.

रोज एक फळ खाण्याची सवय लावा

बऱ्याच काळापासून असे म्हटले जाते की ताजी फळे खाण्याचे फायदे खूप आहेत. यामुळेच सर्वांनी ही वस्तुस्थिती स्वीकारून आपल्या आहारात फळांचा समावेश केला आहे. फळाची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यात अनेक प्रकारची जीवनसत्त्वे, खनिजे आणि आहारातील फायबरसारखे पोषक घटक आढळतात. यामुळे आपले शरीर मजबूत होते. फळे शरीराला चांगल्या प्रकारे कार्य करण्यास मदत करण्यासाठी विविध प्रकारचे पोषक प्रदान करतात. फळांमुळेच शरीराची प्रतिकारशक्ती वाढते आणि आपल्या पेशींना दुरुस्तीची संधी मिळते. जरी असे खूप कमी लोक असतील ज्यांनी दररोज एक फळ खाण्याचा विचार केला असेल. चला जाणून घेऊया रोज एक फळ खाणे आरोग्यासाठी का महत्त्वाचे आहे?

▸ **रक्तातील साखरेचे नियंत्रण :** सर्व फळांमध्ये नैसर्गिकरित्या साखर असते. त्यात फायबर आणि पोषक घटक देखील असतात. त्यांच्यामुळे रक्तप्रवाहात साखर शोषून घेण्याची क्षमता कमी होते. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी झपाट्याने वाढत नाही.

▸ **मानसिक आरोग्य :** फळांमध्ये नैसर्गिकरीत्या काही पोषक घटक असतात, ज्यामुळे आपले मानसिक आरोग्य चांगले राहते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे जामुन, जे मानसिक आरोग्य सुधारणारे फळ म्हणून ओळखले जाते.

▸ **वजन नियंत्रणात ठेवा :** फळांची एक चांगली गोष्ट म्हणजे त्यामध्ये कॅलरीज कमी असतात. त्यात फॅटचे प्रमाणही कमी आढळते, तर फायबर आणि पाण्याचे प्रमाण अधिक असते. यामुळेच आहारात फळांचा समावेश केल्यास वजन नियंत्रित ठेवण्यास मदत होते.

▸ **ॲंटिऑक्सिडंट्स :** फळांमध्ये ॲंटिऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात आढळतात. यामुळे, तुमच्या पेशींना ऑक्सिडेटिव्ह तणावामुळे होणारे नुकसान टाळण्याची संधी मिळते. ॲंटिऑक्सिडंट्स हृदयविकाराचा झटका, कर्करोग आणि न्यूरोडीजनरेटिव्ह विकारांचा धोका देखील कमी करतात.

▸ **पचन सुधारते :** फळे नैसर्गिक एन्झाईम्सने भरलेली असतात. यामुळे तुमची पचनक्रिया चांगली होते. उदाहरणार्थ, अननसातील ब्रोमेलेन आणि पपईतील पपेन हे पचनासाठी चांगले असतात. हे एन्झाइम प्रथिने तोडण्यास मदत करतात.



उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी

जीवनशैलीत करा हे बदल

आजकाल प्रत्येक वयोगटातील व्यक्तीला उच्चदाबाचा त्रास होताना दिसत आहे. खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयी, चुकीची जीवनशैली, अधिक मिठाचं सेवन करणं किंवा तणावामुळे अनेक लोकांना उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होते. उच्च रक्तदाबमुळे (हाय ब्लडप्रेशर) हृदयरोग आणि स्ट्रोकचा धोका वाढतो. त्यामुळे स्वस्थ राहण्यासाठी आपला रक्तदाब नियंत्रणात असणं गरजेचं आहे. उच्च रक्तदाबाची काही तशी खास लक्षणं नसल्याने तो हळूहळू शरीरात प्रभावित होत जातो. ही समस्या दूर करण्यासाठी दैनंदिन दिनचर्या सुरळीत ठेवणं, त्यात काही आवश्यक चांगले बदल करणं महत्त्वाचं आहे.

उच्च रक्तदाबाची समस्या नियंत्रित ठेवण्यासाठी आहारात फळं आणि हिरव्या भाज्यांचं सेवन करणं आवश्यक आहे. त्याशिवाय लो फॅट डेअरी उत्पादने, सुकामेवा, कडधान्यं यासारख्या पदार्थांचं सेवन करणं फायदेशीर ठरतं.

जेवणात मिठाचं प्रमाण कमी केल्यानेही उच्च रक्तदाबाची समस्या कमी होते. जे लोक दिवसांतून १५०० एमजीहून कमी मिठाचं सेवन करतात त्यांचा रक्तदाब नियंत्रणात राहतो. खाताना कधीही अन्नपदार्थांवरून मीठ टाकू नये.

वजन वाढल्यानेही उच्च रक्तदाबाची समस्या होते. त्यामुळे कॉलेस्ट्रॉल आणि मधुमेह वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे आपल्या उंचीप्रमाणे आपलं वजन नियंत्रणात असणं गरजेचं आहे.

नियमित व्यायाम करणं सर्व आजारांवर सर्वोत्तम उपाय आहे. व्यायामामुळे तणाव कमी करण्यासही मदत होते. त्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो. दररोज ३० मिनिटं व्यायाम करणं उच्च रक्तदाबावर नियंत्रण मिळवण्यासाठी सर्वोत्तम उपाय आहे.



ड्राय आणि सुरकुतलेल्या त्वचेसाठी आपला आहार जबाबदार आहे. पर्याप्त पोषण मिळाल्यावर आपलीही त्वचा तजेलदार होऊ शकते. तसे तर विभिन्न त्वचेसाठी वेगवेगळ्या आहाराची गरज असते परंतु निरोगी आणि तजेलदार त्वचेसाठी आपल्या आहारात हे व्हिटॅमिन्स असणे गरजेचे आहे. पाहू ग्लोइंग स्किनसाठी आवश्यक व्हिटॅमिन्स...

तजेलदार त्वचेसाठी आवश्यक आहे हे व्हिटॅमिन्स...



सर्वप्रथम आपल्याला भरपूर पाणी प्यायला हवं. पाणी स्किनसाठी सर्वश्रेष्ठ औषधी आहे. पाणी आपल्या पूर्ण शरीराला रिफ्रेश करतं आणि आपल्या त्वचेला चमकदार करण्यात मदत करतं. ज्या प्रकारे शरीराला ऑक्सिजनची गरज आहे त्या प्रकारे स्किनसाठी व्हिटॅमिन्स आवश्यक आहे. पुढीलप्रमाणे व्हिटॅमिन्स आपल्या त्वचेला तजेलदार ठेवण्यात मदत करतील :

व्हिटॅमिन सी : हे रसदार फळांमध्ये आढळतं जसे संत्रं, लिंबू आणि मोसंबी

व्हिटॅमिन ए : याचे मुख्य स्रोत आहे- पपई, संत्रं, एग यॉर्क

व्हिटॅमिन बी : हे फळांसह सर्व पालेभाज्यांमध्ये आढळतं

व्हिटॅमिन इ : हे शेंगदाणे आणि इतर ऑइल सीड्समध्ये आढळतं.

पायांच्या सुजण्यावर कोरफड एकच रामबाण उपाय

पायांना सूज येण्यामागे अनेक कारणे आहेत. अधिक काळ उभे राहणे, पायाला काही दुखापत होणे, पायामधून रक्त येणे इ. त्यामुळे पायांच्या दुखण्याच्या समस्या वाढतात. चालताना देखील अनेक त्रास होतो. अशा त्रासापासून सुटका करून घेण्यासाठी लोक औषधांचा वापर करतात. औषधांच्या वापरामुळे योग्य फायदा होत नाही. त्यासाठी एक घरगुती उपाय नक्कीच करून पाहा. कोरफडच्या वापरामुळे ही समस्या कमी होण्याची शक्यता आहे. आपल्या रोजच्या जीवनात कोरफडचे अनेक फायदे आहेत.

कोरफडमध्ये अनेक पोषक तत्त्वे असतात

कोरफडमध्ये व्हिटॅमिन्स, एन्जाइम्स, सॅलिसिलिक ॲसिड, ॲण्टीऑक्सिडेंट, मिनरल्स, अमीनो ॲसिड हे पोषक तत्त्वे मोठ्या प्रमाणात आढळतात. कोरफडच्या पाण्यात काही वेळ पाय ठेवल्यास अत्यंत फायदा होतो.



लागणारे साहित्य

■ कोमट पाणी कोरफडचा गर

मॉइश्चराइजर

एका बादलीमध्ये कोमट पाणी घ्या, त्यामध्ये कोरफडचा गर एकजीव करून घ्या. आता या पाण्यात अर्ध्या तासासाठी पाय राहू द्या. काही वेळानंतर पायांना मॉइश्चराइजर लावा.



पोटाच्या कर्करोगासाठी हळद फार उपयुक्त

आपल्या दैनंदिन जीवनात हळदीचा वापर होत असतो. हळदीचा उपयोग फक्त स्वयंपाकासाठी नाही तर इतर कामांसाठी सुद्धा फायदेशीर ठरतो. हळद ज्याप्रमाणे जेवणाला चवदार बनवते त्याचप्रमाणे ती आरोग्यास अत्यंत लाभदायक आहे. फक्त किरकोळ आजारांसाठी हळद फायदेशीर नाही, तर गंभीर आजारावरसुद्धा हळद महत्त्वाची भूमिका बजावते. कक्यूर्मा लॉन्गा (हळदीचे झाड) यांच्या मुळांमधून निघणाऱ्या करक्युमिन पोटामध्ये होणाऱ्या कर्करोगास रोखण्यास मदत करतो.

फेडरल युनिव्हर्सिटी ऑफ साओ पाउलो (युनिफासएसपी) आणि फेडरल युनिव्हर्सिटी ऑफ पॅरा (यूएफओ)च्या संशोधकांनी ही माहिती ब्राझिलमध्ये प्रदान केली आहे. कर्क्यूमिन व्यतिरिक्त, हिस्टोन क्रियाकलाप सुधारित करण्यासाठी इतर यौगिकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यात कोल्कालसी फेरॉल, रेव्हरेट्रॉलोल, क्वार्सेटिन, गार्सनॉल आणि सोडियम बटायट्रेट (आहारातील फायबरच्या निषेधा नंतर आतड्यातील बॅक्टेरियाद्वारे उत्पादित) यांचा समावेश असतो. ग्लोबल कॅन्सर रिसर्च इंटरनॅशनलच्या पोटाच्या कर्करोगाच्या आकडेवारीनुसार, जागतिक पातळीवर प्रत्येक वर्षी एकूण ९ लाख ५२ हजार गॅस्ट्रिक कर्करोग्रस्त रुग्ण आढळले आहेत. ज्यामध्ये अंदाजे ७ लाख २३ हजार रुग्ण कर्करोगाने बळी पडतात. म्हणजे एकूण ७२ टक्के रुग्ण या गंभीर आजाराचे शिकार होतात.



भारत देशात पोटाचा कर्करोग झाल्याची रुग्णांची संख्या सुमारे ६२ हजार एवढी आहे. त्यामध्ये ८० टक्के रुग्ण प्रत्येक वर्षी मृत्युमुखी पडतात. याबाबतीत हेल्थ केअर फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. के.के.अग्रवाल यांनी आपले मत व्यक्त केले आहे. 'पोटाचा कर्करोग हळूहळू विकसित होतो. त्यामुळे सुरुवातीला कोणतीही लक्षणे समोर येत नाहीत.' पोटाच्या कर्करोगाच्या सामान्य लक्षणांमध्ये भूक कमी लागणे, वजन कमी होणे, पोटात दुखणे, अपचन होणे, उल्टी होणे (रक्ताची उल्टी होण्याची शक्यता), पोटाला सुज येणे इ. यापैकी काही लक्षणांवर रुग्ण तत्काळ उपचार घेतो. कारण हे लक्षणे दिसण्यात येतात. परंतु उपचारानंतरही हे आजार कायम राहतात.

कर्करोगाच्या उच्च दराचे प्रमुख कारण म्हणजे, यांत्रिक युगात तणावाचे प्रमाण वाढले आहे. धूम्रपान करणे आजाराचे प्रमुख कारण आहे. पोटाच्या कर्करोगासाठी योग्य वेळी योग्य उपचार घेते महत्त्वाचे आहे. डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यावश्यक आहे. पहिल्या काही वर्षांमध्ये ३ ते ६ महिने सतत डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे असते, असे वक्तव्य डॉ. के.के. अग्रवाल यांनी व्यक्त केले आहे.

जांभूळ खा आणि तंदुरुस्त राहा

■ जांभळामध्ये असलेल्या मधुमेहविरोधी गुणधर्मामुळे रक्तातील साखर नियंत्रित राहते. जांभळामुळे रक्तातील स्टार्च आणि साखरेचं रूपांतर ऊर्जेमध्ये होतं.

■ जांभळाच्या फळासोबतच जांभळाच्या बियांची पावडर, जांभळाच्या झाडाची साले, जांभळाचा रस याचाही मधुमेहाच्या उपचारात चांगला उपयोग होतो.

■ जांभळाच्या झाडाच्या सालाची आणि बियांची पावडर पोटाच्या विकारावर गुणकारी असते. डायरिया, अपचन, जुलाब यासारख्या आजारात ती फायदेशीर ठरते.

■ जांभूळ नैसर्गिकरीत्या रक्त शुद्ध करते. जांभळामध्ये मोठ्या प्रमाणावर लोह म्हणजेच आर्यन असतं. त्यामुळे जांभूळ खाल्ल्यानेही रक्तातील हिमोग्लोबीन वाढतं.

■ जांभळात मोठ्या प्रमाणात 'अ' आणि 'क' जीवनसत्त्वं असतं. तसेच खनिजंही असतात त्याचा उपयोग डोळ्यांचं आणि त्वचेचं आरोग्य सुदृढ ठेवण्यास होतो. रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते.

■ जांभूळ थंड फळ असल्यानं पोटातील आग आणि अपचन यावर उपयोगी असतं.

■ जांभूळ खाल्ल्यानं दात आणि हिरड्या मजबूत होतात. तसेच दात आणि हिरड्यात संसर्ग होत नाही.

■ जांभळाच्या बियांची पावडर गायीच्या दुधात मिक्स करून हा लेप चेहऱ्याला लावल्यास चेहऱ्यावरच्या मुरुम, पुटकुळ्या निघून जातात.

■ ज्यांना भूक लागण्याची समस्या आहे त्यांनी जांभळाचं व्हिनेगर/सिरप दिवसातून दोन ते तीन वेळेस पाण्यासोबत समप्रमाणात घेतल्यास भूक वाढते.

■ जांभळाच्या ज्यूसचा उपयोग अशक्तपणा, ॲनेमिया यावरही होतो. तसेच जांभळाच्या ज्यूसच्या नियमित सेवनानं स्मरणशक्ती वाढते.

स्मोकिंग, अल्कोहोल, तणाव व जंकफूड या गोष्टीमुळे लिव्हरवर ताण पडतो. यामुळे अनेकांना लिव्हरच्या संदर्भातील आजार उद्भवतात. त्यापासून मुक्तता मिळवायची असेल तर जेवणात नियमित हळदीचा वापर करावा. रात्रीच्या वेळी झोपताना चिमूटभर हळद दुधामध्ये टाकून दूध प्यावे. त्यामुळे तुमचे लिव्हर चांगले राहते व तुम्हाला कफ, खोकला या रोगांपासून मुक्तता मिळेल.

लिव्हर (यकृत)साठी घरगुती उपाय गुणकारी

आवळ्यामध्ये लिव्हरचे रक्षण करण्याचे गुण असतात.

■ जे लोक अल्कोहोलिक फॅटी लिव्हर रोगामुळे त्रस्त आहेत. त्यांच्या लिव्हरमध्ये ट्रान्सएमानेज एन्झाइम्सचे प्रमाण वाढते. ज्येष्ठमधातील तत्त्व या एन्झाइमचे प्रमाण लिव्हरमधून कमी करण्यात सक्षम आहेत. त्यामुळे ज्येष्ठमध लिव्हरसाठी लाभकारी ठरते.

■ जुने लोक आपल्या तुळशीच्या रोपांसोबत गुळवेलीचेही रोप लावत, कारण गुळवेल ही तुळशीप्रमाणे आपले शरीर निरोगी ठेवण्यास मदत करते. म्हणून जुने लोक गुळवेलीची ४-५ पाने दररोज चावून चावून खात.

■ जवसाच्या बियांमध्ये साइटोर्कोन्स-टीट्यूएंट्स आढळून येते. त्यामुळे हार्मोन्सला एकत्रित होण्यापासून रोखले जाते. यामुळे लिव्हरवर कमी दाब पडतो.

■ बीट, कोबी, गाजर, ब्रोकली, कांदा, लसूण, आदी भाज्या लिव्हरसाठी फायदेशीर असतात.

■ आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते तसेच पोटासाठी आवळा फायदेशीर आहे. कारण या



पायधुनीनंतर भिवंडीत शोरमा, पिज्झा आणि फालुद्यातून विषबाधा

बाधितांचा आकडा 14 वरुन 37 वर, डॉक्टरांनी काय सांगितलं?

शोरमा खाल्ल्यानंतर भिवंडीतील तब्बल ३७ नागरिकांना विषबाधा झाली आहे. या धक्कादायक घटनेनंतर सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. या घटनेतील रुग्णसंख्याही वाढत असल्याने आता चिंता व्यक्त केली जात आहे.



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मुंबईतील पायधुनी परिसरात काही दिवसांपूर्वी अन्नातून विषबाधेच्या संशयास्पद घटनेत एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाला होता. त्या घटनेची चर्चा सुरू असतानाच आता भिवंडीत आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सुरुवातीला १४ जणांना विषबाधा झाल्याची माहिती समोर आली होती. मात्र, आता हा आकडा तब्बल ३७ वर पोहोचला असून रुग्णांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. भिवंडीतील खंडूपाडा परिसरातील एका शोरमा सेंटरमधून शोरमा, पिज्झा आणि फालुदा खाल्ल्यानंतर अनेकांना उलट्या, जुलाब, पोटदुखी आणि मळमळ यांसारखा त्रास सुरू झाला. प्रकृती बिघडल्याने सर्वांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. विशेष म्हणजे या रुग्णांमध्ये दोन लहान मुलांचाही समावेश आहे.

शोरमा विक्रेत्यावर एफडीएची कारवाई

घटनेची गंभीर दखल घेत अन्न व औषध प्रशासनाने संबंधित शोरमा विक्रेत्यावर रात्रीच धडक कारवाई केली. दुकानातील अन्नपदार्थांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आल्याची माहिती मिळत आहे. विषबाधेचे नेमके कारण काय, याचा शोध घेण्यासाठी तपास सुरू आहे.

चिकन शोरमा, पिज्झा खाल्ल्याने ३७ जणांना विषबाधा

उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू... हॉटेल चालकाविरोधात गुन्हा दाखल



भिवंडी : शहरातील खंडूपाडा परिसरात चिकन शोरमा, पिज्झा आणि फालुदा खाल्ल्याने तब्बल ३७ जणांना अन्नातून विषबाधा झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. बाधित रुग्णांवर स्व. इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून, या प्रकरणी शांतीनगर पोलिसांनी संबंधित हॉटेल चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. गुरुवारी रात्री एका कुटुंबातील सहा सदस्यांसह १४ जणांना अचानक मळमळ, उलट्या आणि पोटदुखीचा त्रास सुरू झाला. त्यांना तातडीने स्व. इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर शुक्रवारी सकाळी आणखी २३ जणांना अशाच प्रकारची लक्षणे दिसून आल्याने त्यांनाही उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यामुळे बाधितांची एकूण संख्या ३७ वर पोहोचली आहे. प्राथमिक माहितीनुसार, संबंधित नागरिकांनी खंडूपाडा येथील 'फेमस शोरमा' या दुकानातून चिकन शोरमा, पिज्झा आणि फालुदा खरेदी करून घरी नेऊन सेवन केले होते. त्यानंतर काही तासांतच त्यांना उलट्या, मळमळ, जुलाब, पोटदुखी आणि तीव्र अशक्तपणाचा त्रास सुरू झाला. दरम्यान, या घटनेची गंभीर दखल घेत अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने रात्री उशिरा संबंधित हॉटेलची पाहणी करून विविध अन्नपदार्थांचे नमुने तपासणीसाठी जप्त केले आहेत. याप्रकरणी शांतीनगर पोलिसांनी हॉटेल चालक दिलशाद अन्सारी याच्याविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी दिली.

दोन महिन्यांत २६५ कोटी जमा

ठाणे महापालिकेची मालमत्ता कर संकलनात मोठी झेप

ठाणे महानगरपालिकेच्या मालमत्ता कर संकलन मोहिमेला यंदा नागरिकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या अवघ्या दोन महिन्यांच्या कालावधीत महापालिकेच्या तिजोरीत तब्बल २६५ कोटी रुपयांचा मालमत्ता कर जमा झाला आहे. विशेष म्हणजे, कर भरण्यासाठी नागरिकांनी ऑनलाइन आणि कॅशलेस व्यवहारांना मोठ्या प्रमाणावर पसंती दिल्याने महापालिकेच्या डिजिटल सेवा उपक्रमाला मोठे यश मिळाले आहे.



■ठाणे। प्रतिनिधी,

ठाणे महानगरपालिकेच्या मालमत्ता कर संकलन मोहिमेला यंदा नागरिकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या अवघ्या दोन महिन्यांच्या कालावधीत महापालिकेच्या तिजोरीत तब्बल २६५ कोटी रुपयांचा मालमत्ता कर जमा झाला आहे. विशेष म्हणजे, कर भरण्यासाठी नागरिकांनी ऑनलाइन आणि कॅशलेस व्यवहारांना मोठ्या प्रमाणावर पसंती दिल्याने महापालिकेच्या डिजिटल सेवा उपक्रमाला मोठे यश मिळाले आहे. महापालिकेने नवीन आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच करदात्यांना एसएमएस आणि डिजिटल लिंकच्या माध्यमातून देयके पाठविली होती. या सुविधेमुळे ११ जून २०२६ पर्यंत शहरातील १ लाख ७७ हजार ३२२ मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला असून, हे प्रमाण एकूण करदात्यांच्या सुमारे ३२ टक्के आहे. महापालिकेच्या ह्याअर्ली बर्डस्‌ योजनेंतर्गत सवलतीचा लाभ घेण्यासाठी हजारो नागरिकांनी मुदतीपूर्वी कर भरला.

ठाणे महापालिकेमार्फत गत आर्थिक वर्षात म्हणजेच २०२५-२६ मध्ये ८७८ कोटी ३७ लाख रुपये इतका विक्रमी मालमत्ता कर संकलित करण्यात आला होता. गतवर्षासाठी ९१५ कोटी रुपयांचे अर्थसंकल्पीय उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले होते, ज्याच्या ९६ टक्के एवढा मालमत्ता कर प्राप्त करण्यात महापालिकेला यश आले होते. यंदाच्या आर्थिक वर्षात सुरुवातीलाच मिळालेल्या या मोठ्या प्रतिसादामुळे पालिकेचे महसूल संकलनाचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण होण्यास मदत होणार आहे.

सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुविधा

महापालिकेच्या आकडेवारीनुसार, सर्वाधिक म्हणजेच १२९.५२ कोटी रुपयांचा कर भरणा ९९ हजार ६२८ करदात्यांनी ऑनलाइन माध्यमातून केला आहे. याशिवाय १८ हजार २९७ करदात्यांनी धनादेश व डिमांड ड्राफ्टद्वारे ११३.२३ कोटी रुपये भरले, तर ५९ हजार ३९७ करदात्यांनी रोख स्वरूपात २२.६२ कोटी रुपयांचा भरणा केला आहे. मालमत्ता कर संकलन सुलभ करण्यासाठी ठाणे महापालिकेने शहरातील १० कर संकलन केंद्रे रविवार वगळता सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सकाळी १० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत सुरू ठेवली आहेत.

टॅक्सी, रिक्षा परवान्यांच्या कागदपत्रांची राज्यव्यापी पडताळणी सुरू... राज्य सरकारचा निर्णय

■मुंबई। प्रतिनिधी,

महायुती सरकारने मार्च २०२५ ते एप्रिल २०२६ या कालावधीत टॅक्सी आणि ऑटो-रिक्षा परवान्यांसाठी सादर केलेल्या कागदपत्रांची राज्यव्यापी पडताळणी मोहीम सुरू केली आहे.

रिक्षा व टॅक्सी परवाने मिळवण्यासाठी अधिवास प्रमाणपत्र आणि पोलीस पडताळणी आदी अहवालासाठी बनावट कागदपत्रे सादर केली गेली होती का? याची तपासणी करण्यासाठी पातळीवर समित्या विभागीय स्थापन करण्यात आल्या आहेत. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत गेल्या महिन्यात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

नोंदींची होणार कसून पडताळणी या समित्यांचे अध्यक्ष हे राज्याच्या सहा महसूल विभागांचे विभागीय आयुक्त असतील. त्यात संबंधित जिल्ह्याचे पोलीस प्रमुख किंवा त्यांचे उपप्रमुख, अतिरिक्त जिल्हाधिकारी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त किंवा जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हास्तरीय माहिती तंत्रज्ञान (आयटी) विभागाचे अभियंता आणि संबंधित जिल्ह्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) यांचा सदस्य म्हणून समावेश असेल.

महायुती सरकारने मार्च २०२५ ते एप्रिल २०२६ या कालावधीत टॅक्सी आणि ऑटो-रिक्षा परवान्यांसाठी सादर केलेल्या कागदपत्रांची राज्यव्यापी पडताळणी मोहीम सुरू केली आहे.



परिवहन विभागाने जारी केलेल्या आदेशानुसार, या चौकशीत अर्जदारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची तसेच ऑटो-रिक्षा बॅज आणि टॅक्सी परवाने मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर नोंदींची कसून पडताळणी केली जाईल.

मिरा-भाईंदरमधून आल्या गंभीर तक्रारी

मिरा-भाईंदर परिसरातून आलेल्या गंभीर तक्रारींनंतर हा राज्यव्यापी चौकशीचा निर्णय घेण्यात आला आहे. या भागात अर्जदारांनी ऑटो-रिक्षा आणि टॅक्सी परवाने मिळवण्यासाठी बनावट कागदपत्रांचा वापर केल्याचा आरोप होता. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या पडताळणी मोहिमेचे आदेश देण्यात आले होते.

अहवालासाठी तीन महिन्यांची मुदत

स्थानिक परिवहन कार्यालयाने केलेल्या विशेष पडताळणी मोहिमेत हे आरोप काही प्रकरणांत खरे असल्याचे आणि बनावट कागदपत्रे सादर केल्याचे निष्पन्न झाले होते. त्यानंतर परिवहन आणि महसूल मंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीनंतर सरकारने संपूर्ण राज्यात समित्या नियुक्त करून या मोहिमेची व्याप्ती वाढवण्याचा निर्णय घेतला. या समित्यांना सर्व अर्जदारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी पूर्ण करून तीन महिन्यांत आपला अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

नाशिकमध्ये पुन्हा खळबळ

'याठिकाणी' घराच्या टेरेसवर गोणीत आढळला मृतदेह

■मुंबई। प्रतिनिधी,

काही दिवसांपूर्वी नाशिक शहरातील तपोवन परिसरात सुटकेसमध्ये मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली होती. ही घटना ताजी असतानाच रविवारी सायंकाळी कामगारनगर परिसरात एका घराच्या टेरेसवर गोणीत अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. मृतदेह कुजलेल्या अवस्थेत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरली होती. यानंतर स्थानिकांनी पाहणी केल्यानंतर ही घटना उघडकीस आली होती. काही दिवसापूर्वीच घडलेल्या एका घटनेनं शहरात खळबळ उडाली असतानाच शहरातील कामगारनगरातील साईबाबा मंदिराजवळील गल्लीत रविवारी सायंकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. मृतदेह कुजलेल्या अवस्थेत असल्याने परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली होती. परिसरातील नागरिकांना दुर्गंधी येत असल्याने त्यांनी परिसराची पाहणी केली असता एका घराच्या टेरेसवर ठेवलेल्या एका गोणीत मृतदेह असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. घाबरलेल्या स्थानिकांनी त्यानंतर तातडीने पोलिसांना याबाबत माहिती दिली.

एल.टी.टी. जवळ भाजप नगरसेवकांनी पकडला गॅस सिलेंडर आणि गुटख्याचा अवैध साठा

■मुंबई। प्रतिनिधी,

लोकमान्य टिळक टर्मिनस (एल.टी.टी.) जवळील स्वराज चौकात शनिवारी २० जून २०२६ रोजी स्थानिक नगरसेवक सुषम सावंत आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी सतर्कता दाखवत अवैध गॅस सिलेंडर आणि गुटखा साठा पकडून दिला. त्यानंतर महापौर रितू तावडे यांनी पोलीस, रेल्वे आणि महानगरपालिका प्रशासन यांना निर्देश देत याप्रकरणी कोणतीही हलगर्जी न करता, या रॅकेटमागील मुख्य सूत्रधारांचा शोध घेऊन त्यांच्यावर सक्त आणि अजामीनपात्र कारवाई करावी. टर्मिनस परिसरात गस्त वाढवून, अनधिकृत फेरीवाले आणि अवैध व्यावसायिक यांच्यावर नियमित कारवाई करावी, रस्ते स्वच्छ करावेत, इत्यादी सूचना केल्या आहेत.



कारवाईची संपूर्ण माहिती घेतल्यानंतर महापौर रितू तावडे म्हणाल्या की, अशा प्रकारचा अवैध सिलेंडर साठा म्हणजे परिसरातील नागरिकांच्या जिवाशी खेळ आहे. तसेच बंदी असतानाही गुटख्याची विक्री होणे पूर्णतः चुकीचे आहे. गुटख्याचे व्यसन तरुण पिढीला उद्ध्वस्त करत आहे. नगरसेवक सुषम सावंत, माजी नगरसेवक राजेश फुलवारिया आणि इतर कार्यकर्त्यांनी दाखवलेली सतर्कता, जागरूकता कौतुकास्पद आहे. आता पोलीस, रेल्वे आणि महानगरपालिका प्रशासन यांनी यात कोणतीही हलगर्जी न करता, या रॅकेटमागील मुख्य सूत्रधारांचा शोध घेऊन त्यांच्यावर सक्त आणि अजामीनपात्र कारवाई करावी. लोकमान्य टिळक टर्मिनस परिसरात गस्त वाढवावी, तसेच अनधिकृत फेरीवाले आणि अवैध व्यावसायिक यांच्यावर नियमित कारवाई करावी, रस्ते स्वच्छ करावेत, इत्यादी सूचना महापौरांनी केल्या.

मिळालेल्या माहितीनुसार, स्वराज चौक परिसरात मागील काही दिवसांपासून संशयास्पद हालचाली सुरू होत्या. लोकमान्य टिळक टर्मिनस परिसराचा वापर करून अवैध मालाची वाहतूक आणि साठवणूक केली जात असल्याचा संशय स्थानिक नगरसेवक सुषम सावंत यांना आला.त्यानंतर त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह परिसरात पाळत ठेवून धाड टाकली. या कारवाईदरम्यान रस्त्याच्या कडेला उभ्या टेम्पो आणि इतर वाहनांमधून मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर घरगुती व व्यावसायिक गॅस सिलेंडर आणि बंदी असलेला गुटख्याचा साठा जप्त करण्यात आला.

नगरसेवक सुषम सावंत यांनी या कारवाईची माहिती महापौर रितू तावडे यांना दिली. त्यानंतर महापौरांनी तत्काळ स्वराज चौकात भेट दिली. जप्त केलेला सिलेंडर आणि गुटखा साठा आणि एकूण परिस्थितीची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. सार्वजनिक सुरक्षेचा प्रश्न निर्माण करणाऱ्या अशा अवैध बाबींवर महापौरांनी तीव्र संताप व्यक्त केला. तसेच, संबंधित पोलिस, रेल्वे आणि महानगरपालिका अधिकारी यांचा पाचारण केले.

दरम्यान, महापौर तावडे यांनी घटनास्थळावरून पोलिस उपायुक्त समीर शेख यांच्याशी दूरध्वनीवर संवाद साधला आणि या प्रकरणात कारवाई करण्याविषयी सक्त सूचना केल्या. यावेळी, महानगरपालिकेचे एम पश्चिम विभागाचे सहायक आयुक्त शंकर भोसले यांच्यासह संबंधित अधिकारीही उपस्थित होते. महापौरांच्या निदेर्शानंतर पोलीस, रेल्वे आणि महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पंचनामा सुरू केला आहे. जप्त केलेला सर्व मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.

रात्री घरातून किंचाळण्याचा आवाज...

अल्पवयीन मुलीवर दोघा वृद्धांचा अत्याचार

■कल्याण। प्रतिनिधी,

कल्याणमध्ये अतिशय धक्कादायक घटना घडली आला आहे. एका 15 वर्षीय अल्पवयीन मुलीवर दोघा जरठ व्यक्तींनी लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणात कोळसेवाडी पोलिसांनी अख्तर मनियार आणि सलीम शेख या दोघांना बेड्या ठोकल्या आहेत. विशेष म्हणजे हे दोघे ६० वर्षांचे आहेत. अल्पवयीन मुलीला आपल्या घरात बोलून तिच्यावर दोघांनी अत्याचार केला अल्पवयीन मुलीने आरडाओरडा केल्यानंतर आजूबाजूच्यांनी पोलिसांना ही माहिती दिल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत मुलीची सुटका करत या दोघांना ताब्यात घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली.

कल्याण पूर्व येथील कोळसेवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत ही घटना घडली. येथील एका घरातून एका १५ वर्षाच्या मुलीचा आरडाओरडा ऐकू येत होता. मुलीचा ओरडाओरड सुरू असताना आजूबाजूला राहणाऱ्या लोकांना जाग आली. लोकांनी घरात जाऊन पाहिले तर घरभर रक्त पसरलेले होते. लोकांनी याबाबत कोळसेवाडी पोलिसांना माहिती दिली. पोलीस घटना स्थळी दाखल झाले. या प्रकरणात पोलिसांनी कोणतीही माहिती अद्याप दिलेली नाही.

लोकप्रतिनिधी झाले आक्रमक

या वेळेला अचानक या घरातून आरडाओरडीचा आवाज आला आणि त्यानंतर आजूबाजूच्या रहिवाशांनी पोलिसांना फोन करून ही घटना सांगितली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दरवाजा उघडला असता पूर्ण घरामध्ये रक्त पडलेले दिसले. यानंतर हा संपूर्ण प्रकार समोर आला सध्या पोलिसांनी दोघांना ताब्यात घेत गुन्हा दाखल करून पुढचा तपास सुरू केला आहे. मात्र, कल्याण कोळसेवाडी परिसरात वारंवार अल्पवयीन मुलीवरती होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात आता स्थानिक आमदार सुलभा गायकवाड, शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक महेश गायकवाड, यासह अन्य नगरसेवक आणि सामाजिक कार्यकर्ते आक्रमक झाले असून पोलिसांना निवेदन देत त्यांना या आरोपींना कठोर कारवाई करावी अशी मागणी यावेळी केली आहे.

घरातच तिच्यावर लैंगिक अत्याचार

मात्र, पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अतिशय धक्कादायक आहे. आरोपींमध्ये अख्तर मणियार आणि सलीम शेख यांची नावं समोर आली आहे. ही दोघे रात्रीच्या वेळी एका पंधरा वर्षांच्या मुलीला घरात घेऊन आले होते. घरातच तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची माहिती आहे. ही मुलगी गरीब कुटुंबातील असल्याचे सांगितले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी मणियार हा एपीएमसी मार्केटमध्ये चहा विक्रीचा व्यवसाय करतो. तर सलीम हा रिक्षा चालक आहे. हे नेहमी विविध मुलींना रात्रीच्या वेळी या घरात घेऊन येतो. नेहमीप्रमाणे काल देखील त्यांनी अशाच प्रकारचे कृत्य केले.



बायकोनं सोडल्यावर संन्यास घेतला

आता आश्रमाच्या मागे सापडली बॉडी, साधूला कुणी संपवलं?

■मुंबई। प्रतिनिधी,

बायको सोडून गेल्यानंतर संन्यास घेतलेल्या एका साधूची हत्या करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. मध्य प्रदेशातील उज्जैन परिसरातील ही घटना आहे. गंगेश्वरी महाराज असे मृत साधूचे नाव आहे. त्यांचे मूळ नाव सुनिल जोशी असे होते. या साधूच्या मृत्यूनंतर चांगलीच खळबळ उडाली आहे. त्यांच्या मृत्यूनंतर तब्बल 10 दिवसांनी समाधी खोदून त्यांचा मृतदेह बाहेर काढण्यात आला आहे. महाराजांचा मृत्यू नैसर्गिक नसून त्यांची हत्या करण्यात आल्याचा संशय त्यांच्या कुटुंबीयांनी व्यक्त केला.

कुटुंबाला का कळवले नाही?

आपल्याला कोणतीही पूर्वकल्पना न देता घाईघाईने अंत्यसंस्कार उरकण्यात आल्यामुळे भावांनी तातडीने पोलिसांशी संपर्क साधला. कुटुंबीयांनी या प्रकरणात थेट हत्येचा आरोप करत तीन गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. जर महाराजांचा मृत्यू नैसर्गिक होता, तर त्यांच्या कुटुंबीयांना न कळवता इतक्या घाईघाईने समाधी का देण्यात आली? तसेच, महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांचे वैयक्तिक सामान आणि त्यांची मोटारसायकल कुटीतून गूढ रितीने गायब कशी झाली? फोन बंद होण्यापूर्वी झालेला वाद हे स्पष्ट करतो की आश्रमात नक्कीच काहीतरी गैरप्रकार घडला होता.

बायकोने सोडल्यानंतर घेतला संन्यास

या संपूर्ण प्रकरणाची गांभीर्य लक्षात घेऊन 20 जून रोजी प्रशासकीय परवानगी मिळाल्यानंतर, पोलिसांच्या उपस्थितीत समाधी खोदण्यात आली आणि मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला. पोलिसांनी सांगितले की, कुटुंबीयांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून, मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होईल. सुनील जोशी यांनी काही वर्षांपूर्वी पत्नीने सोडल्यामुळे सांसारिक जीवनाचा त्याग केला होता आणि उज्जैनमध्ये संन्यास घेतला होता. सध्या पोलीस कुटीशी संबंधित लोकांची चौकशी करत असून महाराजांचे कॉल रेकॉर्ड्स तपासत आहेत.

8 दिवसांपूर्वीच समाधी

आठ दिवसांपूर्वी गंगेश्वरी महाराज यांनी आपल्या भावांशी फोनवर संवाद साधला होता. ते लवकरच आपल्या आईला एका धार्मिक यात्रेवर नेण्याच्या तयारीत होते. मात्र, फोनवर बोलत असतानाच अचानक महाराजांचे कोणासोबत तरी कडाक्याचे भांडण सुरू झाले, ज्याचा आवाज त्यांच्या भावांनीही ऐकला. त्यानंतर लगेचच फोन कट झाला आणि बंद झाला. काहीतरी अघटीत घडल्याच्या शंकेने जेव्हा भाऊ त्यांना शोधत उज्जैनमधील कुटीत पोहोचले, तेव्हा त्यांना धक्काच बसला. तिथे त्यांना सांगण्यात आले की महाराजांचा मृत्यू झाला असून, 8 दिवसांपूर्वीच आश्रमाच्या मागे त्यांना समाधी देण्यात आली.



भोंदू बाबाकडून बलात्कार अन्....

■मुंबई। प्रतिनिधी,

काळी सावली आणि नकारात्मक शक्तीच्या प्रभावाखाली असलेल्या महिलेच्या समस्या सोडवण्यासाठी भोंदूने सुमारे 40 हजार रुपये घेतले, नंतर लैंगिक अत्याचार करण्यात आले, या घटनेनं परिसर हादरून गेला. कानपुरच्या देहात जिल्ह्यातील देवराहत पोलीस ठाणे परिसरातील एका बोतल बाबा विरोधात लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला. महिलेच्या तक्रारीवर पोलिसांनी हरिओम यादव उर्फ बोतल बाबांसह इतर पाच लोकांविरोधात तक्रार दाखल केली. पोलिसांच्या माहितीनुसार, पीडितेचा असा आरोप की, काही दिवसांपासून संबंधित बाबाने तिला काळी सावली आणि नकारात्मक शक्तीच्या प्रभावाखाली असल्याचं सांगितलं. ही समस्या सोडवण्याच्या नावाखाली तिच्याकडून सुमारे 40 हजार रुपये घेतले.

पुजा पाठ करण्याच्या हेतूने पीडितेवर अश्लील कृत्य

संबंधित महिलेनं दावा केला की, पुजा पाठ करण्याच्या हेतूने तिची अब्रु लुटली. या प्रकरणात तिचा असा आरोप होता, तिथे पोहोचल्यानंतर पीडितेवर अश्लील कृत्य करण्यात आले, नंतर लैंगिक अत्याचार करण्यात आला. पीडितेनं दावा केला, जेव्हा तिने प्रतिकार केला असता, भोंदू बाबा आणि साथीदारांनी मिळून पीडितेवर हल्ला केला.

आरोपीने पीडितेवर हल्ला केला

पीडितेनं आरोप केला की, प्रतिकार केल्यावर तिच्यावर हल्ला केला. इतकंच नाही,तर आरोपीने तिचा गळा दाबून तिला ठार केले. महिलेल्या सांगण्यानुसार, तिने आपली आरोपीच्या तावडीतून कशी बशी सुटका केली, नंतर स्वतःचा जीव वाचवत तिने पोलिसांना या घटनेची माहिती दिली. आरोपी बाबाविरूद्ध इतर चार ते पाच अज्ञात व्यक्तींवर गुन्हा दाखल केला. पोलिसांनी पीडितेची वैद्यकीय तपासणी देखील केली. अहवालाच्या आधारे प्रकरणाचा पुढील तपास सुरू करण्यात आला आहे. घटनास्थळावरील तपास, मिळवलेले पुरावे आणि पीडितेच्या जबाबाच्या आधारे प्रकरणाचा तपास करण्यात आला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com